सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३११ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजित पवार यांच्या विमानातील ब्लॅकबॉक्स जळाला?

## विमान दुर्घटनेतील अत्यंत महत्वाचा पुरावा नष्ट? दुर्घटनेबाबत सर्वात शॉकिंग अपडेट!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १६ फेब्रुवारी :** २८ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्रात भयानक घटना घडली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान दुर्घटनेत निधन झाले. अजित पवारांचा घातपात की अपघात असा प्रश्र्न अनेकांना पडला. अशातच आता त्यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अनेक गंभीर प्रश्र्न उपस्थित केलेत. अजित पवार यांचा घातपात झाला असल्याचा संशय आमदार रोहित पवार यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत व्यक्त केला. त्यानंतर दिल्लीतून रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या मृत्यूप्रकरणी मोठा धक्कादायक खुलासा केला. अशातच आता अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत सर्वात शॉकिंग अपडेट समोर आली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानातील ब्लॅकबॉक्स जळलेल्या अवस्थेत सापडल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. ब्लॅकबॉक्स कसा जळू शकतो? विमान अपघातात काहीही झालं तरी ब्लॅकबॉक्स अबाधित राहतो, याचा तपास कामात उपयोग केला जातो! मग नेमकी याच प्रकरणात ब्लॅकबॉक्स कसा काय जळला? विमान खराब दर्जाचे होते का? असे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

विमान अपघात प्रकरणातील ब्लॅक बॉक्स जळाल्यामुळे डेटा रिकव्हर करण्यात अडचणी येत असल्याची माहिती समोर येत असताना, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी तातडीने पारदर्शक माहिती जाहीर करण्याची मागणी केली आहे. मिटकरी यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ब्लॅक बॉक्स परदेशात रिकव्हर होणार असून अपघाताची माहिती लवकरच मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र तोपर्यंत विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज, पायलट साहिल मदन, पायलट यश, पायलट सुमित कपूर आणि शांभवी पाठक हे घरून किती वाजता व कोणत्या वाहनातून निघाले?



ते कुठल्या रोडवर ट्रॅफिकमध्ये अडकले होते काय़ तसेच संबंधित ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज, या सर्व बाबी २८ जानेवारी २०२६ रोजीच्या दिनांक आणि वेळेसह महाराष्ट्राला कळवाव्यात, अशी त्यांनी विनंती केली आहे.अपघाताबाबत अनेक प्रश्र्न उपस्थित होत असल्याने संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करण्यासाठी उपलब्ध सर्व पुरावे आणि तांत्रिक माहिती सार्वजनिक करावी, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. दरम्यान, या मागणीमुळे संबंधित यंत्रणांवर पारदर्शकतेचा दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत रोहित पवार सातत्यानं पाठपुरावा करत आहेत. याच संदर्भात त्यांनी एक्स समाजमाध्यमावर पोस्ट करुन माहिती दिली आहे. स्व.दादांच्या दुर्दैवी अपघाताचा आज विसावा दिवस असून अद्यापही DGCA कडून प्राथमिक चौकशी अहवाल आलेला नाही, तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या तडठ कंपनीविरोधात देखील काहीही कारवाई अद्यापर्यंत झालेली नाही, परिणामी शंका अधिक बळावत चालल्या आहेत. त्यामुळे DGCA ने लवकरात लवकर प्राथमिक चौकशी अहवाल द्यावा तसेच तडठ वर योग्य ती कारवाई करावी !

**विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट**

दरम्यान, अजित पवारा यांच्या विमान अपघाताचा नवा व्हिडिओ समोर आला आहे. बारामती तालुक्यातील गोजुबावी येथे २८ जानेवारी रोजी सकाळी घडलेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या बातमीने गावकऱ्यांसह आसपासच्या परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली होती. विमान कोसळल्यानंतर काही क्षणांतच त्याला भीषण आग लागली होती. ज्वाळा उसळत असतानाच अचानक पुन्हा एक जोरदार स्फोट झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे.

# नरेंद्र मोदींचा मुंबई दौरा, गेट वे ऑफ इंडियाजवळ कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. १६ फेब्रुवारी :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येत असून मोदींच्या दौऱ्यानिमित्त मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. पंतप्रधान उद्या १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २.१५ वाजता मुंबईत येणार आहेत. त्यानंतर, दुपारी २.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यात लोकभवन (यापूर्वीचे राजभवन) येथे द्विपक्षीय बैठक पार पडणार आहे. त्यानंतर, दुपारी ५ वाजता नरेंद्र मोदी आणि मॅक्रोन यांची हॉटेल ताज येथे विविध कंपन्यांच्या सीईओंसोबत राऊंडटेबल चर्चा होणार आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर मुंबईतील वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ६.३० वाजता मुंबईतील 'गेट वे ऑफ इंडिया' परिसरात इंडो-फ्रान्स सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी, व्हीव्हीआयपी नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे. त्या पार्श्र्वभूमीवर दक्षिण मुंबईतील अनेक रस्ते वाहतूकीसाठी बंद राहणार आहेत. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया



येथे मंगळवारी भारत-फ्रान्स यांचा संयुक्त India-France Year of Innovation हा कार्यक्रम होणार आहे. याच पार्श्र्वभूमीवर वाहतूकीत बदल करण्यात आले आहेत. दक्षिण मुंबईतील अनेक रस्ते बंद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. फ्रान्सच्या वाणिज्य दूतवासाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून. १४ ते २२ फेब्रुवारीदरम्यान हा कार्यक्रम होत असून याची सुरुवात उद्या मंगळवार १७ फेब्रुवारी होणार आहे.

गेटवे ऑफ इंडिया येथे आयोजित भारत-फ्रान्स 'इयर ऑफ इनोव्हेशन' कार्यक्रमाच्या (१४ ते २२ फेब्रुवारी २०२६; मुख्य कार्यक्रम १७ फेब्रुवारी) पार्श्र्वभूमीवर लगतच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडीची शक्यता आहे. त्यामुळे १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत खालील वाहतूक व्यवस्था लागू राहील, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली.



नागरिकांच्या गरजा आणि विकासाच्या वाटेवर निघालेला देश अर्थात भारत सध्या विविध मार्गांनी प्रगतीपथावर वाटचाल करत असतानाच शेजारी राष्ट्रांना थक्क करण्याचं कामही करत आहे. सध्या चीनची झोप भारतानं उडवली असून यास कारणीभूत ठरत आहे तो म्हणजे एक बोगदा. भारतातली पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा झाली असून, २०२७ पर्यंत ही ट्रेन सेवेत दाखल होईल.

# राज्यातील थकीत कर्जदार शेतकऱ्यांची माहिती पाठवा


## सर्व बँकांना सरकारचे आदेश, अर्थसंकल्पीय अधिवेशनात गोड बातमी मिळण्याची शक्यता!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १६ फेब्रुवारी :** राज्य सरकार कर्जमाफीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण पावलं उचलत असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील सर्व बँकांना थकीत शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारकडून गोड बातमी मिळणार असल्याचं बोललं जात आहे.

जून २०२५ पर्यंत थकीत कर्जदार शेतकऱ्यांची माहिती नाशिक जिल्हा बँकेकडून देखील घेतली जात आहे. ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून इतर शेतकऱ्यांची माहिती मिळवण्याची प्रक्रिया जिल्हा बँकेकडून सुरू आहे. याबाबत नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी माहिती दिली आहे.

राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत केली आहे. या समितीद्वारे राज्यातील जे थकबाकीदार शेतकरी आहेत. त्या शेतकऱ्यांची ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या तारखेदरम्यानची माहिती मागवण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील सेवा सरकारी सोसायटी, सचिव, बँकेचे तपास अधिकारी, बँकेचे शाखाअधिकारी यांच्यामार्फत आम्ही थकीत कर्जदार शेतकऱ्यांची माहिती गोळा करत आहोत. यामध्ये सहनिबंधक, निबंधक सरकारचे अधिकारी यांचेही सहकार्य मिळतंय, अशी माहिती अरविंद शिंदे यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली.



**२३ फेब्रुवारीपासून राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन**

महाराष्ट्राच्या राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, हे अधिवेशन २५ मार्चपर्यंत चालणार आहे. तसेच ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अर्थसंकल्प सादर करणार आहेत. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाची रूपरेषा निश्र्चित करण्यात आली. त्यानुसार राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. यादरम्यान, ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. तसेच, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णय घेण्यात आला.

# अलवारमध्ये बेकायदेशीर फटाका कारखान्याला भीषण आग; ८ कामगारांचा होरपळून मृत्यू

**अलवार/वृत्तसंस्था :** राजस्थानच्या अलवार जिल्ह्यातील भिवाडी औद्योगिक क्षेत्रात सोमवारी एका बेकायदेशीर फटाका कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत किमान ८ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून अजूनही दोन कामगार कारखान्यात अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ज्यावेळी ही दुर्घटना घडली, तेव्हा कारखान्यात सुमारे २५ कामगार उपस्थित होते. आगीची बातमी समजताच शेजारील कारखान्यांमधील कामगारांनी सुरक्षिततेसाठी बाहेर धाव घेतली. कारखान्याच्या मालकाने ही जागा भाड्याने दिली होती, जिथे भाडेकरू बेकायदेशीररित्या फटाके तयार करत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. कारखान्यात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेली दारूगोळा आणि कार्डबोर्डमुळे एका भीषण स्फोटानंतर आग झपाट्याने पसरली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून आसपासचे कारखाने रिकामे करण्यात आले आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीदरम्यान ३ ते ४ मोठे स्फोट झाले, ज्यामुळे नागरिक आणि कामगारांमध्ये प्रचंड घबराट पसरली.

# भारत-इस्त्रायल संबंधांना नवी ऊर्जा मिळणार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावित इस्रायल दौऱ्यापूर्वी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी भारताचे कौतुक केले असून भारत-इस्रायल संबंधांना भक्कम भागीदारी असे संबोधले आहे.

जेरुसलेममध्ये मेजर अमेरिकन ज्यूइश ऑर्गनायझेशन्सच्या परिषदेला संबोधित करताना नेतन्याहू यांनी सांगितले की पुढील आठवड्यात भारताचे पंतप्रधान इस्रायलला भेट देणार असून दोन्ही देश सर्व प्रकारच्या सहकार्याबाबत चर्चा करतील. यावेळी नेत्याहू यांनी भारत-इस्रायल संबंधांना भक्कम भागीदारी असे संबोधले.

पंतप्रधान मोदी यांचा इस्रायल दौऱ्याची अधिकृत तारीख जाहीर झालेली नसली तरी नवी दिल्लीतील एआय समिटनंतर ते २७-२८ फेब्रुवारीला इस्रायलला जाऊ शकतात. त्यांचा हा दौरा धोरणात्मक, संरक्षण, सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील सहकार्याला नवी दिशा देऊ शकतो. मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच इस्रायल दौरा असेल. यापूर्वी त्यांनी २०१७ मध्ये इस्रायलला भेट दिली होती. त्या ऐतिहासिक दौऱ्यात दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांना २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्र्वभूमीवर संरक्षण सहकार्य, शेती, जलव्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि दहशतवादविरोधी भागीदारी यांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली होती.

आगामी भेटीत दोन्ही नेते द्विपक्षीय सहकार्याबरोबरच पश्र्चिम आशियातील सध्याची सुरक्षा परिस्थिती आणि जागतिक मुद्द्यांवरही विचारविनिमय करू शकतात. वर्षाच्या सुरुवातीलाही दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला होता, ज्यात गाझाशी संबंधित शांतता प्रयत्न आणि प्रादेशिक स्थैर्याबाबत चर्चा झाली. त्या वेळी पंतप्रधान मोदी यांनी न्याय्य आणि टिकाऊ शांततेसाठी भारताच्या पाठिंब्याचा पुनरुच्चार केला होता.

मोदी आणि नेतन्याहू यांच्यात वैयक्तिक पातळीवरही चांगले संबंध असल्याचे मानले जाते. गेल्या काही वर्षांत दोन्ही नेत्यांनी अनेक मंचांवर एकमेकांशी मैत्री दाखवली आहे. हा संभाव्य दौरा भारत-इस्रायल संबंधांना नवी ऊर्जा देणारा ठरू शकतो. संरक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि प्रादेशिक सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत सहकार्य अधिक बळकट होण्याची अपेक्षा आहे.

# १७ फेब्रुवारीला दुपारी ३:२६ वाजता लागणार सूर्यग्रहण; २ मिनिटे २० सेकंदांचा असेल 'रिंग ऑफ फायर'चा थरार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** वर्ष २०२६ मधील पहिले सूर्यग्रहण मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ (फाल्गुन अमावस्या) रोजी लागणार आहे. भारतीय वेळेनुसार, हे ग्रहण दुपारी ३:२६ वाजता सुरू होईल आणि संध्याकाळी ७:५७ वाजेपर्यंत असेल. तब्बल ४ तास ३० मिनिटे या खगोलीय घटनेचा प्रभाव जाणवेल. जगभरातील खगोलप्रेमींचे या दुर्मिळ घटनेकडे लक्ष लागले आहे.

**भारतात दिसणार का?**

खगोलप्रेमींसाठी महत्त्वाची बाब म्हणजे, हे ग्रहण दक्षिण गोलार्धातून जाणार असल्याने भारतातून दिसणार नाही. ग्रहण भारतात दिसणार नसल्यामुळे धार्मिक मान्यतेनुसार पाळला जाणारा 'सूतक काळ' येथे लागू होणार नाही. भारतात कोणत्याही शुभ कार्यावर किंवा दैनंदिन दिनचर्येवर या ग्रहणामुळे निर्बंध नसतील.

**ग्रहणाची वेळ आणि खास क्षण**

या ग्रहणाचा सर्वात महत्त्वाचा आणि अद्भूत क्षण केवळ २ मिनिटे २० सेकंदांचा असेल. या काळात चंद्र सूर्याचा ९६ टक्के भाग व्यापेल. सर्यू ग्रहणाची सुरुवात दुपारी ३:२६ (भारतीय वेळ) होईल. परमोच्च स्थिती : संध्याकाळी ५:४२ वाजता असेल. संध्याकाळी ७:५७ वाजता संपेल.



**खगोलप्रेमी अनुभवणार 'रिंग ऑफ फायर'चा थरार**

वैज्ञानिक भाषेत याला वलयाकार सूर्यग्रहण असे म्हणतात. या काळात चंद्र पृथ्वीपासून दूर असल्याने तो सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही. परिणामी, सूर्याचा मधला भाग काळवंडतो आणि कडेने एक तेजस्वी प्रकाशवर्तुळ दिसते. हे दृश्य एखाद्या सोन्याच्या अंगठीप्रमाणे किंवा 'आगच्या कड्या'सारखे (रिंग ऑफ फायर) दिसते.

**कोठे पाहता येईल हे दृश्य?**

हे सूर्यग्रहण प्रामुख्याने अँटार्क्टिका खंडात सर्वात स्पष्टपणे दिसेल. त्याशिवाय दक्षिण आफ्रिका, टांझानिया, झांबिया, झिम्बाब्वे यांसारख्या आफ्रिकन देशांमध्ये आणि दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना व चिलीच्या काही भागांत हे ग्रहण अंशतः पाहता येईल.






## थोडक्यात...

### अँड टीव्ही कलाकारांचा महाशिवरात्री उत्साह

**छत्रपती संभाजीनगर :** महाशिवरात्रीच्या निमित्ताने अँड टीव्हीवरील कलाकारांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आगामी मालिका 'हे भगवान...' मधील जयशंकर त्रिपाठी यांनी महादेवाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत उपवास व प्रार्थनेचे महत्त्व सांगितले. 'घरवाली पेडवाली' फेम पारस अरोरा बाईकवरून शिवमंदिरांना भेट देऊन शांतता शोधणार आहेत, तर 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा यंदा त्र्यंबकेश्र्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेणार आहेत. 'भाबीजी घर पर है'चे रोहिताश्र्व गौड कुटुंबासोबत पारंपारिक पूजा आणि महाप्रसाद करून हा सण साजरा करणार आहेत. या कलाकारांनी प्रेक्षकांना त्यांच्या मालिका पाहण्याचे आवाहन करत महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

### २०२६ च्या कोमेड-के आणि यूनि-गॉज प्रवेश परीक्षा ९ मे रोजी होणार आहेत.

**पुणे :** कोमेड-के यू-जी-ई-टी / यूनी-गॉज २०२६ प्रवेश परीक्षा शनिवार, ९ मे २०२६ रोजी होणार आहे. ही एकत्रित राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा संपूर्ण भारतातील पदवीपूर्व अभियांत्रिकी प्रवेशांसाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे, जी कर्नाटकातील १५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये आणि देशभरातील ३० हून अधिक प्रतिष्ठित खाजगी, स्वयं-निधी आणि अभिमत विद्यापीठांमध्ये प्रवेश प्रदान करते.ही परीक्षा कर्नाटक विनाअनुदानित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये संघटना ((कूपेका आणि यूनी-गॉज सदस्य विद्यापीठांशी संलग्न संस्थांद्वारे ऑफर केलेल्या बी.ई./बी.टेक कार्यक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी आहे. ही संगणक-आधारित चाचणी भारतातील २००+ शहरांमध्ये घेतली जाईल, ज्यामध्ये ४००+ चाचणी केंद्रे समाविष्ट आहेत. सुमारे १४०,००० विद्यार्थी परीक्षेला बसण्याची अपेक्षा आहे. देशभरातील उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.१ अर्ज करण्याची मुदत: ३ फेब्रुवारी २०२६ ते १६ मार्च २०२६, संपूर्ण अर्ज आणि परीक्षा प्रक्रिया ऑनलाइन घेतली जाईल. पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि परीक्षा मार्गदर्शक तत्त्वांबद्दल तपशीलवार माहिती अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे.

### मूलभूत आघात जीवन समर्थन प्रशिक्षण आयोजित

**नाशिक :** कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमाच्या सहकार्याने सेव्हलाइफ फाउंडेशन (एसएलएफ) ने नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग-६० वर प्रथम प्रतिसादकर्ते आणि अंमलबजावणी कर्मचाऱ्यांसाठी बेसिक ट्रॉमा लाइफ सपोर्ट (बीटीएलएस) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला.१० फेब्रुवारी रोजी नाशिकमध्ये आणि ११ फेब्रुवारी रोजी मालेगावमध्ये प्रत्येकी ५० सहभागींनी सहभाग घेतला होता. एसएलएफच्या झिरो-फॅटलिटी कॉरिडॉर (झेडएफसी) कार्यक्रमाचा भाग म्हणून आयोजित या प्रशिक्षणाचा उद्देश क्रिटिकल कॉरिडॉर पोलिस पथकांचे जीवनरक्षक कौशल्य बळकट करणे हा होता. क्षमता बांधणी आणि प्रथम प्रतिसाद देणाऱ्या प्रशिक्षणात केंद्रित गुंतवणूकीद्वारे, हा उपक्रम रस्ते अपघातातील प्रतिबंधात्मक मृत्यू कमी करण्याचा आणि अपघातानंतरच्या गंभीर क्षणी पीडितांपर्यंत वेळेवर, जीवनरक्षक काळजी पोहोचेल याची खात्री करण्याचा प्रयत्न करतो.

### ग्रामीण उपजीविकेत डाळींची भूमिका महत्त्वाची

**मुंबई :** भारतीय कुटुंबांची पोषण सुरक्षा, मातीचे आरोग्य आणि ग्रामीण उपजीविकेत डाळींची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, हवामान परिस्थिती, विखुरलेली जमीन, कीटक आणि रोगांचे सततचे त्रास आणि दर्जेदार बियाण्यांची मर्यादित उपलब्धता यामुळे डाळी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादकतेच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते आहे. यासाठी मुळापासून मजबूत पाठिंब्याची गरज अधोरेखित होते.या आव्हानांना तोंड देण्यासाठी गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाने जागतिक डाळी दिनानिमित्त पाच लाखांहून अधिक डाळी उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवत शेतकरी संपर्क उपक्रम हाती घेतला. चांगल्या कृषी पद्धतींच्या (जीएपी) आधारे नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम या उपक्रमात आयोजित केले गेले, ज्यात दीर्घकालीन डाळींच्या लागवडीला पाठिंबा देण्यासाठी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले.

### संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालयातील निर्मला बोराडे (सुसर) यांना पीएच.डी. प्रदान



**सोयगाव :** सोयगाव येथील संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालयातील ग्रंथपाल निर्मला बोराडे यांना पीएच.डी.प्रदान करण्यात आली. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात पीएच.डी.प्रदान करण्यात आली.प्रा.निर्मला बोराडे (सुसर) यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथालयाच्या विकासात विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका एक तुलनात्मक : अभ्यास या विषयावर शोध प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ज्ञान स्रोत केंद्राच्या माजी संचालिका डॉ.शकुंतला लोमटे यांच्या मार्गदर्शनात संशोधन पूर्ण केले.यावेळी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ (नाना) काळे,सचिव प्रकाश (दादा) काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या अध्यक्ष ज्योतीताई काळे,जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# आता जनतेची कामे करा : आ.अब्दुल सत्तार

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. १६ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित जि. प. व पं. स. सदस्यांचा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहरातील शिवसेना भवन परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळात लोकांची सेवा करण्यास कमी पडू नका, जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचे आवाहन केले. आपण विकासाला मतदान मागितले. त्यामुळे विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.



आमदार अब्दुल सत्तार यांनी आपल्या भाषणात मतदार, कार्यकर्ते आणि समर्थकांचे मनःपूर्वक आभार मनात नवनिर्वाचित सर्व सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मतदारांनी दाखवलेला विश्वास ही मोठी जबाबदारी आहे. गावागावातील रस्त्यांची दुरुस्ती, शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शिक्षणाच्या दर्जात सुधारणा, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करणे, महिला सक्षमीकरण तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे या मुद्द्यांवर ठोस आणि नियोजनबद्ध काम झाले पाहिजे.

नवनिर्वाचित सदस्यांनी विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि समन्वय ठेवावा, असेही त्यांनी सांगितले. जनतेने दिलेला कौल हा विकासासाठी आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, गावपातळी वरील निवडणूक असो की मोठी प्रत्येक निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पक्ष बांधणी करून महिला संघटन व युवकांची मजबूत फळी निर्माण करा असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलत असताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, मतदारांनी विकास, पारदर्शकता आणि जनहिताच्या कामांवर शिक्कामोर्तब केले आहे. मतदारांनी दिलेला कौल हा विकासाच्या अपेक्षेने दिलेला आहे; त्या विश्वासाला तडा जाणार नाही याची दक्षता घ्या, ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे शिवसेनेचे धोरण अंमलात आणून सर्वसामान्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून द्या.

व्यासपीठावर तालुकाप्रमुख केशवराव तायडे, नगराध्यक्ष अब्दुल समीर अ.सत्तार, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, जि. प. चे माजी सभापती राजेंद्र राठोड, माजी जि. प. अध्यक्ष श्रीराम महाजन, कृउबा समितीचे सभापती विश्वास दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, संचालक दामू अण्णा गव्हाणे, नंदकिशोर सहारे, राजाराम पाडळे,शेख जावेद, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, शहरप्रमुख मनोज झंवर, माजी जि. प.सदस्य मुरलीधर काळे, कौतिकराव मोरे, डॉ. संजय जामकर, राजू बाबा काळे, रउफ बागवान, अजिजसेठ बागवान, नवनिर्वाचित जिल्हा परिषद मंगलाताई केशवराव तायडे, आशाबाई अर्जुन गाढे, अब्दुल आमेर अब्दुल सत्तार, देविदास माणिकराव पालोदकर, आयेशा सय्यद नासिर हुसेन, निकिता राजेंद्र काळे तसेच पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्य जया सतीश ताठे, सुरेखा आनंदा शिंदे, सोफिया इब्राहिम शेख, रघुनाथ मोरे, रजनीताई नगरे,निजाम खान पठाण, रजिना बेगम अब्दुल समद, शेख सलीम भीकन तसेच सोयगावच्या गोंदेगाव गनाच्या नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य गयाबाई गोविंदा घोडे व निंबायती गणाच्या सविता सोपान गव्हांडे यांच्यासह सयाजीराव वाघ ,राजेंद्र ठोंबरे, दत्ता कुडके, डॉ. विठ्ठल जाधव , बापूराव काकडे, अक्षय मगर, मतीन देशमुख, राहुल सपकाळ, रुपेश जयस्वाल, अरविंद शिंदे, मुक्ताराम पाटील, पंकज जैस्वाल, प्रशांत शिरसागर, गणेश पाटील, शेषराव सोनवणे, तेजराव पवार, अंबादास सपकाळ, हरिदास ताठे आदींची उपस्थिती होती.

## एमजीएममध्ये माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १६ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा आर्यभट्ट सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या माजी विद्यार्थी मेळाव्यास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख, प्राध्यापक, माजी विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख म्हणाल्या, महाविद्यालयाच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात वेगाने होत असलेल्या बदलांच्या पार्श्र्वभूमीवर माजी विद्यार्थ्यांचे सध्या महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन महत्वाचे आहे. उद्योगजगतामध्ये वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्ये, आणि करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना दिशा देण्यात माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

या माजी विद्यार्थी मेळाव्यात सध्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी संवाद सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये करिअर, उच्च शिक्षण आणि तांत्रिक कौशल्यांवर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ऋतुजा गाजरे आणि शालिनी बकाल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माजी विद्यार्थी सेल प्रमुख डॉ.अपूर्वा साळुंके, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधितांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १६ फेब्रुवारी :** सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने उत्सव समिती जाहीर करण्यात आली. सोयगाव शहरात याही वर्षी घेण्यात आलेल्या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीची कार्यकारणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली.अध्यक्ष हर्षल काळे,उपाध्यक्ष रोऊफ शेख कालू,कार्याध्यक्ष विजय काळे,कोषाध्यक्ष कदिर शहा सचिव पदी संदीप चौधरी यांची निवड करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ सदस्य रवींद्र काळे, ड.योगेश पाटील,नगरसेवक राजेंद्र दुतोंडे,पवन परदेशी, कृष्णा जूनघुरे,प्रमोद पाटील,अंकुश पगारे,सुनील काळे,तेजस काळे,स्वप्नील चौधरी,कार्तिक चौधरी,ऋतिक चौधरी,देवेंद्र चौधरी,भाऊसाहेब काळे, आदित्य काळे,अतुल चौधरी,बंटी चौधरी,दीपक परदेशी, गणेश साळुंखे,गोपाल गांगुर्डे,हर्षल गावंडे,जयेश गाडेकर, शुभम गाडेकर,कल्पेश बागुल,कुणाल पाटील,मनोज मनगटे, निखिल पाटील,राजेश काळे,रितेश काळे,साहिल पाटील, साई परदेशी,आयुष चौधरी,श्रीराम काळे,सोनू काळे,शोबराज चौधरी,सोनू पाटील,सोनू काळे,कमलेश काळे,प्रसाद काळे,मोहित पाटील,ओम काळे,यश काळे, ऋषी काळे,आतुल चौधरी,पूनम परदेशी तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त यांची उपस्थित होते.



# समाजकार्याचे यशस्वी प्रयोग समाजव्यापी व्हावेत : लिमये

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ फेब्रुवारी :** समाजातील परिवर्तनाचे यशस्वी प्रयोग वैयक्तिक पातळीवर मर्यादित न राहता व्यापक स्तरावर राबविले गेले, तरच व्यवस्था परिवर्तन शक्य होईल, असे प्रतिपादन अतुल लिमये यांनी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



संशोधन क्षेत्रातील पुरस्कार दादा लाड, तर समाजप्रबोधनासाठीचा पुरस्कार आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. अध्यक्ष डॉ. अजित मराठे यांनी प्रास्ताविक, तर कार्यवाह राजन गोऱ्हे यांनी स्वागत केले.

लिमये यांनी शासनावरील वाढते अवलंबित्व समाजाला अपंग बनवू शकते, असे नमूद करत विकसित भारतासाठी अनुकरणीय कार्यप्रणाली उभारण्याची गरज व्यक्त केली. फिरोदिया यांनी हिंदुत्व ही जीवनपद्धती असून मूल्याधिष्ठित आचरण म्हणजे धर्म, असे सांगत जनकल्याण समितीच्या कार्यासाठी एक कोटी रुपयांची देणगी जाहीर केली.

भारतभूषण महाराजांनी सनातन परंपरेतून आत्मिक व सामाजिक उन्नतीचा संदेश दिला. दादा लाड यांनी कापूस पिकावरील संशोधनातून 'गळफांदी' काढून 'फळफांदी' वाढविण्याच्या तंत्रामुळे बोंडाचे वजन १० ग्रॅमपर्यंत वाढून उत्पादन १५ क्विंटल प्रति एकरपर्यंत पोहोचल्याचा दावा केला.

चिंचवडच्या पूर्वांचल छात्रावासातील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम सादर केले. प्रदीप सबनीस यांनी आभार मानले, तर प्रा. डॉ. प्रांजली देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

## निसर्ग साहिलीद्वारे विद्यार्थ्यांचे पक्षी अभयारण्याचे अवलोकन

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १६ फेब्रुवारी :** वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण, पैठण या कार्यालयाच्या सहकार्यातून जि प प्रशाला मुलांची पैठण येथील शाळेची निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले. नाथ सागर येथील पक्षी अभयारण्य,आरण्यम प्रकल्प या ठिकाणी विध्यार्थानी भेट दिली. श्री शेषराव गर्जे यांनी विध्यार्थ्यांना नाथ सागर जलाशय निर्मिती, पक्षी अभयारण्यात येणारे पक्षी या विषयी विध्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. वनपाल वैद्य जी ए यांनी अरण्यम प्रकल्प निर्मिती, प्रकल्पात लागवड करण्यात आलेल्या विविध वृक्षाच्या प्रजाती या विषयी मार्गदर्शन केले.या वेळी वन परिक्षेत्र अधिकारी श्री सातपुते जी एस ,वनपाल घोळवे एस ए, वनरक्षक श्रीमती जाधव एस आर, प्रशालेतील सर्व शिक्षक आदी उपस्थित होते.

## प्रीमियर चषक २०२६ स्पर्धेतील कन्नड न प ने पटकवले प्रथम बक्षीस

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद , दि. १६ फेब्रुवारी :** गिरीश स्थान नगरपरिषद खुलताबाद यांच्यावतीने आयोजित प्रीमियर चषक२०२६ स्पर्धेतील प्रथम पारितोषिक जिंकून ट्रॉफी विजेत्या संघांचा सत्कार खुलताबाद नगर परिषदेचे नगराध्यक्ष अमीर पटेल व मुख्याधिकारी शेख समीर यांच्या हस्ते ट्रॉफी मानचिन्ह देऊन, करण्यात आला,



सदर स्पर्धेमध्ये नगरपरिषद कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. स्पर्धेत कन्नड नगरपरिषद, गंगापूर नगरपरिषद, फुलंब्री नगरपंचायत तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग घेतला.

स्पर्धेमध्ये कन्नड नगरपरिषद विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावत, ट्रॉफी जिंकण्याचा बहुमान प्राप्त केला केली. गंगापूर नगरपरिषद यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तर फुलंब्री नगरपंचायत यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सर्व सहभागी नगरपरिषदांचे अधिकारी व कर्मचारी यांनी गिरीस्थान नगरपरिषद, खुलताबाद मुख्याधिकारी. समीर शेख. कार्यालयीन अधीक्षक रुस्तम फुलारे. जितेंद्र बोचरे. अंकुश भराड पाटील जय किशन दळवी किशोर मोरे गणेश पवार गणेश रोटे सतीश भालेराव काशीम बेग .संतोष आव्हाड सुभाष भालेराव शुभम देवकर नितीन गोल्हार राहुल कांबळे. यांच्यासह सर्व नगर परिषद कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले

स्पर्धेदरम्यान फुलंब्री नगरपंचायतचे मुख्याधिकारी ज्ञानेश्र्वर ठोंबरे, कन्नड नगरपरिषदचे मुख्याधिकारी रवींद्र लांडे, तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सहआयुक्त विकास नवाळे यांनी उपस्थित राहून सहभाग नोंदविला.


### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम. ए. क्रं. १११/२०२६

अर्जदार:- १)अलीबेग अफजलबेग बेग वय ७१ वर्षे, धंदा सेवानिवृत्त रा. अरबी मदरसा जवळ, खाजा नगर, गंगापूर, -ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो.नं. ९८६०२७६६२४ २) करीम अफजल बेग वय ६१ वर्षे, धंदा - मजूरी रा. जुनी तहसील रोड, धनगर गल्ली, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) फरीदा भ्र. नजीर खान वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. घर नं. २३, रईस किराणा जवळ, बिसमील्लाह कॉलनी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैर अर्जदार:- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन क्ट तखखख १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

-सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर अती गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ते ३ आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांचे वडील नामे अफजल बेग फतरू बेग हे दिनांक १५/०१/१९७१ रोजी राहत्या घरी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ३ यांची आई नामे जमरूत बी भ्र. अफजल बेग ह्या दिनांक १५/०८/२००१ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत अफजल बेग फतरू बेग यांना अर्जदार क्रं. १ व २ मुले आणि अर्जदार क्रं. ३ विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत अफजल बेग फतरू बेग यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणात पुढील तारीख ३०/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक.**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. श्री. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी फिरकीळ अर्ज क्रमांक ५९१/२०२५

अर्जदार

१-रमेश पिता सुखलाल पाटील, वय ५७ वर्षे,धंदा शेती, रा.मु.पो. सायगव्हाण, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २-लताबाई भ्र. दिलीप देसले, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. पो. चिंचखेडे, ता. व जिल्हा धुळे

३-सुभाष पिता माधवराव पाटील, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा.मु.पो.एस.आर.पी. कॉलनी, नकाणे रोड, देवपुर, धुळे ४-भारती भ्र. सुधाकर पाटील, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा.घर नंबर ९९६९, पवारवाडी, ४० गांव, जि. जळगांव. नुतन भ्र. रविंद्र पाटील, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु.पो.एस.आर.पी. कॉलनी, नकाणे रोड, देवपुर, धुळे ६-तेजस्वीनी पिता रविंद्र पाटील, चय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. संत गाडगेबाबा चौक, एस. आर. पी. कॉलनी, नकाणे रोड, देवपुर, धुळे ७ गिरीश पिता रविंद्र पाटील, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. संत गाडगेबाबा चौक, एस.आर.पी. कॉलनी, नकाणे रोड, देवपुर, धुळे ८- आरती भ्र. प्रमोद पाटील, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. प्लॉट नंबर ३२. किरण सोसायटी, नाकणे रोड, देवपुर धुळे, ता.जि. धुळे ९- मुनीष पिता प्रमोद पाटील, वय ८ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. आरती अर्जदार क्रमांक ८ जन्मदाती आई रा. वरील प्रमाणे

१० मृनाली पिता प्रमोद पाटील, वय ८ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. आरती अर्जदार क्रमांक ८ जन्मदाती आई रा. वरील प्रमाणे -

विरुध्द

निरंक

गैरअर्जदार

अर्ज -बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड.एस.एन. उपासणी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ व २ यांची आई, अर्जदार क्रमांक ३ यांची सासु ४ यांची आजी, तसेच अर्जदार क्रमांक ५ व ८ यांची आजे सासु व अर्जदार क्रमांक ६,७,९ व १० यांची पणजी नामे वेणुवाई सुखलाल पाटील ही दिनांक १७.६.२०२० रोजी मौजे सायगव्हाण, ता. कनड येथे मयत झाली आहे, सोवत विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी ग्राम पंचायत सायगव्हाण, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. त्याच प्रमाणे अर्जदार क्रमांक १ व २ यांचे वडील, अर्जदार क्रमांक ३ यांचे सासरे तसेच अर्जदार क्रमांक ४ यांचे आजोबा, अर्जदार क्रमांक ५ व ८ यांचे आजे सासरे व अर्जदार क्रमांक ६,७,९ व १० यांचे पणजीवा नामे सुखलाल दौलत पाटील हे दिनांक २८.११.२००६ रोजी मौजे सायगव्हाण, ता. कन्नड येथे मयत झालेले आहेत, त्याच प्रमाणे अर्जदार क्रमांक १ व २ यांची बहीण, अर्जदार क्रमांक ३ ची पत्नी व अर्जदार क्रमांक ४ यांची आई, तसेच अर्जदार क्रमांक ५व ८ यांची सासु तसेच अर्जदार क्रमांक ६,७,९ व १० यांची आजी नामे विमलबाई सुभाष पाटील ही दिनांक १३.९.२०२१ रोजी मौजे चाळीसगांव ता. चाळीसगांव येथे मयत झाली आहे, तसेच अर्जदार क्रमांक १ व २ यांचा भाचा, अर्जदार क्रमांक ३ चा मुलगा ४ हिचा भाऊ, तसेच अर्जदार क्रमांक ५ यांचे पती व अर्जदार क्रमांक ६ व ७ यांचे वडील, अर्जदार क्रमांक ८ चा दिर, व अर्जदार क्रमांक ९ ते १० यांचे काका नामे रविंद्र सुभाष पाटील हे दिनांक २६.३.२०२२ रोजी मर्माचे धुळे, तालुका व जिल्हा धुळे येथे मयत झाले आहे, तसेच अर्जदार क्रमांक १ व २ यांचा भाचा, अर्जदार क्रमांक ३ चा मुलगा अर्जदार क्रमांक ४ हिचा भाऊ, तसेच अर्जदार क्रमांक ५यांचा दिर व अर्जदार क्रमांक ६ व ७ यांचे काका, अर्जदार क्रमांक ८ चा पती, व अर्जदार क्रमांक ९ ते १० यांचे वडील नामे प्रमोद सुभाष पाटील हे दिनांक १.२.२०२३ रोजी मौजे धुळे, तालुका व जिल्हा धुळे येथे मयत झाले आहे, मयतांच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सवव सदरील अर्ज करणेस कारण घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. मयतांचे मृत्युचे ठिकाण सायगव्हाण ता. कत्रड येथील मे. न्यायालयाचे कक्षेत येत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदारांनी या न्यायालयात मागणी केली आहे. त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बावत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मथतांचे कायदेशीर वारस असल्या बावतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल, सबब आज दिनांक १६/२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : १८/२/२०२६ पुढील तारीख २३/०२/२०२६

**लिपीक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड**
**आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**व्ही .एम.पाखरे**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कनड**

## संक्षिप्त वृत्त...

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गुगळी धामणगाव येथे भव्य रक्तदान शिबिर



**सेलू,/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बळीराजा मित्र मंडळाच्या वतीने गुगळी धामणगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबिर गुगळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात पार पडणार आहे.

बळीराजा मित्र मंडळाच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून विविध समाजाभिमुख उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, गरजू कुटुंबांना मदत अशा अनेक विधायक कार्यांमधून मंडळाने सामाजिक कार्याचा ठसा उमटविला आहे. रक्तदान शिबिरासारखा जीवनदायी उपक्रम हाती घेऊन मंडळाने पुन्हा एकदा समाजसेवेची परंपरा कायम ठेवली आहे. रक्ताची गरज ही कोणत्याही क्षणी उद्भवू शकते. अपघात, शस्त्रक्रिया, गंभीर आजार अशा परिस्थितीत रुग्णांना तातडीने रक्ताची आवश्यकता भासते. अशा वेळी स्वेच्छेने दिलेले रक्त अनेकांचे प्राण वाचवू शकते. या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन बळीराजा मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

शिबिरात वैद्यकीय तज्ञांची टीम उपस्थित राहणार असून रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करूनच रक्तसंकलन केले जाणार आहे. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून त्यांच्यासाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

गुगळी धामणगाव व परिसरातील युवक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त रक्तदानाचा संकल्प पूर्ण करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### गुन्हेगारांवर प्रशासनाचा धडक प्रहार : सहा अट्टल गुन्हेगारांसह दोन अवैध दारू विक्रेत्यांना वर्षभरासाठी हद्दपार

**सेलू,/प्रतिनिधीः-** परभणी जिल्ह्यातील सेलू व जिंतूर परिसरात वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. सेलूचे उपविभागीय दंडाधिकारी शैलेश लाहोटी यांनी सहा अट्टल गुन्हेगारांसह दोन अवैध दारू विक्रेत्यांना जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार (तडीपार) करण्याचे आदेश दिले आहेत. या धडक कारवाईमुळे गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

मागील काही महिन्यांपासून अवैध वाळू उपसा, घरफोडी, चोरी, जुगार आणि अवैध दारू विक्रीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने पोलिस प्रशासनाने विशेष मोहीम राबविली होती. त्याअंतर्गत १३ फ ब्रुवारी रोजी सहा जणांच्या हद्दपारीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. हद्दपार करण्यात आलेल्यांची माहिती रोहण उर्फ सुंदर बाबासाहेब वाटूरे (रा. वालूर) ५ गंभीर गुन्हे दाखल; परभणी जिल्ह्यातील ४ तालुके व जालना जिल्ह्यातील ३ तालुक्यांतून हद्दपार. राधाकिशन पिराजी साळवे (रा. देऊळगाव) अवैध दारू विक्री प्रकरणी परभणी जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार.युवराज उर्फ प्रेम बाळू लाटभजे (रा. सेलू) ३ गंभीर गुन्हे; परभणी व जालना जिल्ह्यातील ७ तालुक्यांतून हद्दपार. भगवान सखाराम मते (रा. वझर बु.) ५ गंभीर गुन्हे; परभणी जिल्ह्यातून हद्दपार. सलमान खान नशीब खान पठाण (रा. चारठाणा) खुनाचा प्रयत्न व अवैध दारू विक्री; परभणी व जालना जिल्ह्यातून हद्दपार. शेख वजीर शेख बिसराम उर्फ साई (रा. जिंतूर) जुगार व खुनाचा प्रयत्न यांसह ६ गंभीर गुन्हे; परभणी जिल्ह्यातून हद्दपार. प्रशासनाच्या या निर्णायक कारवाईमुळे परिसरातील अवैध धंद्यांना मोठा चाप बसणार असल्याचे बोलले जात आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पुढेही अशाच कठोर उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात



**गंगाखेड,/प्रतिनिधी-** महापुरुष जयंती समितीच्या वतीने भगवती मंदिर शिवाजी चौक गंगाखेड येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

वक्त्यांनी आपल्या मनोगतात संत सेवालाल महाराजांनी समाजात समता, नैतिकता, संयम व बंधुभाव यांचा संदेश दिला असल्याचे सांगितले. वंचित घटकांच्या उन्नतीसाठी तसेच समाजप्रबोधनासाठी त्यांनी केलेले कार्य आजही मार्गदर्शक ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या जयंती कार्यक्रमाचे आयोजन महापुरुष जयंती समितीचे संकल्पक माधवराव चव्हाण यांनी केले. कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती बाबुरावजी पवार, प्रा. डी. एस. जाधव, प्रतिमा वाघमारे, नेमिचंद नखत, प्रशांत वलशेटवार, सर्जेराव घनवटे आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.

### महाशिवरात्रीनिमित्त कोटेश्वर महादेव मंदिरात भव्य दिपोत्सव साजरा

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** येथील श्री चिंतामणी मंदिर परिसरात असलेल्या कोटेश्वर महादेव मंदिर येथे (दिनांक १५ फेब्रुवारी रविवार) रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भक्तिमय वातावरणात भव्य दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.या दीपोत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक व सुंदर पद्धतीने दिव्यांची मांडणी करण्यात आली होती.असंख्य दीपांच्या प्रकाशामुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.मंदीर परिसरात प्रसन्न,शांत आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.भाविकांनी मोठ्या श्रद्धा-भक्तीने दीप प्रज्वलित करून श्री कोटेश्वर महादेवांचे दर्शन घेतले. विशेष म्हणजे,या ठिकाणी दीपोत्सव साजरा करण्याचा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षीही सोनाली ज्ञानेश्वर वाळवंटे आणि ज्ञानेश्वर माधवराव वाळवंटे यांच्या पुढाकारातून यशस्वीपणे पार पडला.त्यांच्या नियोजनबद्ध आयोजनामुळे कार्यक्रम अधिक भव्य आणि सुव्यवस्थित झाला. दिवे लावण्याच्या या पवित्र कार्यात मंदिरातील कर्मचारी तसेच दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला.महाशिवरात्रीच्या या मंगलमय पर्वानिमित्त साजऱ्या झाले आहेत.

# नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांनी १२५ समस्यांचे केले निवारण

## सोनपेठ नगर परिषदेचा पहिल्यांदाच जनता दरबार, २७१ घरकुलधारक आले विविध समस्या घेऊन

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ नगरपालिकेमध्ये सत्ता स्थापन झाल्यानंतर नगराध्यक्ष परमेश्वर कदम हे शहरातील विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी सरसावले असून सोमवारी नगरपरिषदेच्या वतीने पहिल्यांदाच घेण्यात आलेल्या रमाई आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास घरकुल योजना जनता दरबारात त्यांनी २७१ नागरिकांच्या घरकुल संदर्भात विविध समस्या ऐकून घेऊन त्यातील १२५ लाभार्थ्यांच्या विविध समस्यांचे निवारण करून संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाही करण्यासाठी आदेश देऊन घरकुलधारकांचे हप्ते रुकलेले आहेत त्यांना लवकरच घरकुलाची उर्वरित रक्कम देण्यात येणार असल्याचे जनता दरबारात सांगण्यात आले आहे.




सोनपेठ नगर परिषदेमध्ये सध्या कचऱ्याच्या प्रश्नावरून सत्ताधारी- विरोधकांमध्ये कलगीतुरा सुरू असतानाच नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांनी विविध प्रभागांमध्ये जाऊन समस्या जाणून घेत त्यावर प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत, नगरपरिषदेला पाणीपुरवठा होत असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रातून मागील अनेक वर्षापासून अस्वच्छ पाणीपुरवठा होत असताना नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांनी आरोग्याच्या निगडित या गंभीर विषयाकडे लक्ष देऊन दोन वेळा जलशुद्धीकरण केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करून पुढील उपाययोजना करण्यासाठी निर्देश दिले आहेत,आता सोमवारी त्यांनी थेट जनता दरबारच भरवला आणि जनतादरबारामध्ये नागरिकांच्या घरकुलाच्या प्रलंबित प्रश्नाविषयी समस्या ऐकून घेतल्या.

लाभार्थ्यांना दोन-दोन वर्षापासून बांधकामाचा हप्ताच पडला नाही, अनेक लाभार्थ्यांचे जिओ टॅग झाले नाही ,शेजाऱ्यांनी तक्रार केल्यामुळे नगरपरिषदेने घरकुलाचा पहिला हप्ता देऊन दोन वर्षांपूर्वी घरकुल लाभार्थ्यांचे बांधकामच बंद करण्याच्या नोटीसा दिल्याच्या तक्रारीसमोर आल्या,

छोट्या -छोट्या समस्या वरून अनेक घरकुलधारकांचे दोन -चार वर्षापासून बांधकाम रखडल्याचे प्रश्नही जनता दरबाराच्या निमित्ताने समोर आले आहेत.

नगरपरिषदेने घेतलेल्या या जनता दरबारामध्ये गटनेते सद्दाम हुसेन, नगरपरिषद कार्यालयीन अधीक्षक एम. एम. खान नगरसेवक अक्षय कदम, जनार्धन झिरपे, अब्दुल रहेमान सौदागर, शुभम कदम, साजेद कुरेशी, रंगनाथ सोळंके, मारुती रंजवे, सागर देशपांडे, बंडू गिरी ,माने,सहाय्यक प्रकल्प अधिकारी अविनाश भिसे, पत्रकार बांधव यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**परभणी- परभणी महानगरपालिकेच्या महापौरपदी सय्यद एकबाल यांनी दि.१६ पेब्रुवारी रोजी महापौर पदाचा पदभार स्विकारला. यावेळी त्यांना पहिल्याच दिवशी पुष्पगूच्छ देवून मनपाच्यावतीने गौरव करण्यात आला होता. यावेळी मनपाचे अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी दिसत आहेत.**

### संत रविदासांचे विचार आजही प्रेरणादायी-डॉ.राजरत्न आंबेडकर



**गंगाखेड,/प्रतिनिधी-** संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन (दिनांक १५ फेब्रुवारी रविवार) रोजी करण्यात आले.याप्रसंगी संत रविदास महाराजांचे विचार आजही प्रेरणादायी असल्याचे मत डॉ.राजरत्न आंबेडकर यांनी व्यक्त केले.शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे संत रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.विष्णू आसोरे,शशिकांत जाधव यांची उपस्थिती होती.संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू डॉ.राजरत्न आंबेडकर यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी डॉ. राजरत्न आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, संत रविदास महाराजांनी चौदाव्या शतकामध्ये समतेचे राज्य निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले. आपल्या दोह्यांच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन जातीप्रथा, रुढी, परंपरा विरुद्ध जनजागृती करण्याचे कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संत रविदास महाराज यांना आपले गुरु मानले. संत रविदास महाराज यांना अपेक्षित असलेला समाज आजही निर्माण होऊ शकला नाही. त्यांना अपेक्षित असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य आपल्याला करावे लागणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद शिंदे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. महादेव सुरनर यांनी केले. यावेळी शहरासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चर्मकार समाज बांधवांसह मित्र परिवाराने परिश्रम घेतले.

## प्रशासकीय ठरावांवर १२ नगरसेवकांचा एल्गार

### भूखंडगाळे वाटपातील अनियमिततेवर सखोल चौकशीची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी :-** सेलू येथील नगर परिषदेत प्रशासकीय कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या विविध ठरावांवर १२ नगरसेवकांनी गंभीर आक्षेप नोंदवत सखोल चौकशीची मागणी केली आहे. भूखंड वाटप, गाळे वितरण तसेच मोकळ्या जागांबाबत नियमबाह्य निर्णय घेण्यात आल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे.

नगरसेवक तथा गटनेते पवन हेमंतराव आडळकर यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रशासकांच्या कार्यकाळात पारदर्शकता न ठेवता मोठ्या प्रमाणावर ठराव मंजूर करण्यात आले. या ठरावांमुळे नगरपरिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय हितास बाधा पोहोचल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**नगरपालिकेतील सत्तांतरानंतरचे राजकीय तापमान आता चांगलेच वाढू लागले आहे. अध्यक्षपदावर भाजपचा निसटता विजय झाला असला तरी सभागृहातील १४ विरुध्द १२ अशा काट्याच्या आकडेमोडीमुळे विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला. प्रशासकीय कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या भूखंड व गाळेवाटपाच्या ठरावांवरून आता सत्ताधाऱ्यांना घेरण्याची रणनीती आखली जात आहे.**

नगरसेवकांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम च्या कलम ३०८ अंतर्गत संबंधित ठरावांची सखोल चौकशी करून बेकायदेशीर ठराव तात्काळ रद्द करावेत, अशी एकमुखी मागणी केली आहे. तसेच त्या काळातील संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे स्थानिक राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

निवेदनावर स्वाक्षरी करणारे नगरसेवक: हेमंतराव आडळकर, संदीप लहाने, पवन आडळकर, मिलिंद पवार, डॉ. अनिकेत जोगदंड, सौ. महानंदा आडळकर, सौ. प्रविणा रोडगे, कपिल फुलारी, विनोद धापसे, सौ. अनुपमा देवधर, सौ. सपना काळे, श्रीमती सफियाबेगम, श्रीमती मालनबी पठाण.

### आडगांव तांडा येथे संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात



**जिंतूर,/प्रतिनिधी-** आज आमच्या आडगांव तांडा येथे बंजारा समाजाचे आराध्य दैवत तथा प्रेरणादायी संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व आनंदमयी वातावरणात साजरी करण्यात आली, संत श्री सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यात प्रामुख्याने संत श्री सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात आली व भजन, नामस्मरण व जागरण आदी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत श्री सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास ज्येष्ठ व्यक्तीमत्व तथा हभप सर्वश्री झब्बुसींगजी नाईक, सुंदररावजी चव्हाण (उप-सभापती कृउबास जिंतूर), प्रकाशरावजी दाभाडे (माजी सरपंच), विनायकरावजी दाभाडे, उत्तमरावजी राठोड, विश्वनाथ राऊत, विलासराव राठोड, गुलाब राठोड, गोपीचंद चव्हाण, गणेशराव दाभाडे, काशिनाथ राऊत, सर्जेराव नरवाडे, आबासाहेब बर्वे, गजानन चव्हाण, माना पवार, माणिक आढे, सुरदास जाधव, राजू दाभाडे, बाळू दाभाडे, किशोर ठोके, प्रेमदास जाधव, संतोष चव्हाण, आकाश चव्हाण, कैलास राठोड, दिलीप राठोड व आडगांव तांडा येथील व परिसरातील असंख्य बंजारा समाज बांधव, महीला भगीनींसह समाज बांधव मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.

## राष्ट्रावर प्रेम करणाऱ्या शिवसैनिकाला महापौरपदाची संधी- आ.पाटील

**परभणी,/प्रतिनिधीः** राष्ट्रावर प्रेम करणाऱ्या शिवसैनिकाला आम्ही महापौरपदाची संधी दिली आहे. त्यामुळे कुणाचे पोट दुखायचे कारण नाही.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेबांच्या शिवसेनेने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. या देशाला मानणाया प्रत्येक समाजाचा नागरीक आमचा आहे. याच भावनेतून शहरातील सामाजिक सलोखा जपण्याच्या उदात्त हेतूने शिवसेनेने सय्यद इकबाल यांना महापौरपदाची संधी दिली आहे. पुढील अडीच वर्षात हिंदू समाजातील योग्य नगरसेवकाला महापौरपदाची संधी दिली जाईल,अशी ग्वाही आ.डॉ. राहुल पाटील यांनी दिली.

परभणी शहर महापालिकेवर शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसची सत्ता स्थापन झाली आहे. शिवसेनेचे महापौर सय्यद इकबाल आणि काँग्रेसचे उपमहापौर गणेश देशमुख यांनी आ.डॉ.राहुल पाटील यांच्या उपस्थितीत सोमवार, दि.१६ रोजी आपला पदभार स्वीकारला. यावेळी आ.डॉ. पाटील यांनी महापौर आणि उपमहापौर यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना आ.डॉ. पाटील म्हणाले,



बाळासाहेबांच्या शिवसेनेने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. शिवसेना नेहमीच सर्व धर्मियांना सोबत घेऊन समाजहिताचे कार्य करत आली आहे व पुढेही करत राहील. मुस्लीम समाजाचा महापौर केल्याने अनेकांची पोटदुखी सुरु झाली आहे. राज्यभरात त्याची नाहक चर्चा केली जात आहे. जो राष्ट्रावर प्रेम करतो तो कुठल्याही समाजातील असला तरी तो कट्टर देशभक्त आहे अशी बाळासाहेबांची शिकवण होती. याच शिकवणीतून राष्ट्रहिताला प्राधान्य देणाया व उच्चशिक्षित सय्यद इकबाल यांना आम्ही ही संधी दिली आहे. या निर्णयावरून कोणीही राजकारण करू नये. शहरातील सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठीच आम्ही हा निर्णय घेतला आहे.

परभणी शहराला एक विकसित शहर बनविण्याचे काम भविष्यकाळात केले जाईल. पुढील ५ वर्षात कधीही न पाहिलेली विकासकामे शहरात करण्यात येतील. राज्यात आम्ही विरोधी पक्षात असलो तरी विकास कामांसाठी सरकारशी भांडून निधी आणूत. सर्वांना सोबत घेऊन आम्हाला महानगरपालीका देशात क्रमांक १ची करुन दाखवायची आहे, असाही विश्वास आ.डॉ. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

## अग्रलेख...

# सपकाळांचा निषेधार्ह प्रताप

२००७ मध्ये गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पक्षाच्या प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. त्यावेळी सोहराबुद्दीन चकमक आणि गुजरात दंगलीचे मुद्दे प्रचारात जोरात उचलले जात होते. नागरिकांच्या धार्मिक भावना चेतविण्यासाठी आणि अल्पसंख्यकांची मते आपल्या झोळीत पडावीत यासाठी काँग्रेसचे पुढारी भारतीय जनता पक्ष आणि गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका करीत होते. १ डिसेंबर २००७ रोजी गुजरातमधील एका प्रचारसभेत नरेंद्र मोदी यांना, सोनिया गांधी यांनी 'मौत का सौदागर' असे संबोधले. त्यांच्या या वक्तव्यामुळे काँग्रेसचे नेते गदगद झाले. नरेंद्र मोदींचे राजकीय जीवन आता संपलेच समजा, अशा स्वप्नात ते रमले होते. अशा प्रकारची जहाल आणि समाजात भेद निर्माण करणारी विधाने केल्याने आपल्याला राजकीय फायदा होईल, अशी अटकळ काँग्रेस नेत्यांनी बांधली असावी; पण झाले उलटेच! मोदींना 'मौत का सौदागर' संबोधणे काँग्रेसच्या चांगलेच अंगलट आले. सोनिया गांधी यांच्या या विधानाचा फायदा होण्याऐवजी काँग्रेसलाच मोठा फटका बसला. भारतीय जनता पक्ष ११७ जागा घेत पुन्हा सत्तेवर आला तर काँग्रेसला फक्त ५९ जागा मिळाल्या. मोदी पुन्हा एकदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले. मोदींना शिव्याशाप देण्याची ही परंपरा २००७ पासून सुरू झाली, ती हर्षवर्धन सपकाळ यांच्यापर्यंत आजतागायत सुरू आहे. हिंदूंना डिवचणे, त्यांच्या श्रद्धास्थानांचा मुद्दाम अपमान करण्यात काँग्रेसला एक वेगळेच मानसिक समाधान मिळत असल्याचे दिसून येते. बरं, अशी विधाने करणारी नेतेमंडळी काही नवखे कार्यकर्ते नाहीत. सोनिया गांधी, दिग्विजयसिंह, राहुल गांधी, जयराम रमेश, मल्लिकार्जुन खडगे, पृथ्वीराज चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ हे अनुभवी, ज्येष्ठ आणि मोठ्या पदावरील नेते आहेत. समाज त्यांच्याकडे आशेने पाहतो. पण, याच नेत्यांनी काँग्रेस पक्षाला रसातळाला नेण्याचे काम केले आहे. २०१४ नंतर केंद्रात काँग्रेस पक्ष सातत्याने पराभूत होत आला आहे. पण, हिंदू धर्माला शिव्या देण्यात, हिणवण्यात काँग्रेसचे नेते धन्यता मानत आलेले आहेत. २०१४ नंतर या देशातील राजकीय आणि सामाजिक समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. युवावर्ग जागृत झाला असून हिंदू धर्माला शिव्या देत सत्तेवर येण्याचे दिवस आता संपले आहेत. गुजरात दंगल का घडली, हे सर्वांना माहीत असताना त्यासाठी नरेंद्र मोदींना जबाबदार ठरविण्याचे सारे प्रयत्न काँग्रेसने करून पाहिले. केंद्रात सत्तेवर असताना नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांचे खच्चीकरण करण्याचा कटही आखला गेला होता. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाने मोदी-शाह यांना सर्वच आरोपातून मुक्त केले.

वास्तविक पाहता कारसेवा करून परत येणाऱ्या रामभक्तांवर गोधरा रेल्वे स्थानकावर हल्ला करून त्यांना जाळून ठार केल्यानंतरची प्रतिक्रिया म्हणजे गुजरात दंगल होती. कारण, गुजरातचा इतिहास पाहता तेथे हिंदू सातत्याने मार खात आला होता. सुरत, अहमदाबाद येथे तर सातत्याने जातीय दंगली व्हायच्या. कारण, दंगलखोरांना काँग्रेस सरकार पाठीशी घालत होते, पण गोधरा जळीत कांड हा हिंदूंच्या संयमाचा अंत होता. दुर्दैवाने काँग्रेस आणि तथाकथित धर्मनिरपेक्षवादी पुढारी गुजरात जातीय दंगलीचा उल्लेख वारंवार करतात; पण गोधरा जळीत कांड सोईस्करपणे विसरतात किंवा त्याचा उल्लेख करायचे टाळतात. काँग्रेसचे वर्तमान अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान मोदींना विषारी साप संबोधले होते. या विधानावर सडकून टीका झाली; पण, भाजपच्या द्वेषाने पछाडलेल्या काँग्रेस नेत्यांवर याचा काहीच फरक पडत नसल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. राफेल लढाऊ विमानाच्या खरेदीवरून पंतप्रधान मोदींवर टीका करताना 'चौकीदार चोर है' असे म्हटल्याबद्दल राहुल गांधी यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले होते आणि त्यांना याबद्दल माफीही मागावी लागली होती. 'काँग्रेसने माझा ९१ वेळा शिवराळ भाषेत उल्लेख केला,' असे खुद्द पंतप्रधान मोदींनी २०२३ मध्ये कर्नाटकमधील एका सभेत सांगितले होते. असाच 'प्रताप' आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्याबाबतीत अपशब्द उच्चारणे अथवा त्यांची तुलना एखाद्या रक्तपिपासू आणि धर्मवेड्या शासकासोबत करणे कोणताही स्वाभिमानी आणि शिवप्रेमी खपवून घेणार नाही. हे सर्व काही माहीत असताना काही लोक धर्मांध आणि जातीयवादी जगाच्या इतिहासातील सर्वांत क्रूर आणि धर्मवेडा बादशहा औरंगजेब आणि म्हैसूरचा शासक टिपू सुलतानचे उदात्तीकरण करीत असतात याचे आश्चर्य वाटते. मुस्लिमबहुल मालेगाव येथे इस्लाम पार्टी आणि समाजवादी पक्षाने सत्ता स्थापन केली. उपमहापौरांच्या दालनात घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी अथवा अन्य महान विभूतींची छायाचित्रे लावण्याऐवजी मुद्दाम धर्मांध वृत्तीचे प्रदर्शन करीत क्रूरकर्मा म्हैसूरचा शासक टिपू सुलतानचे छायाचित्र लावले गेले. भारतीय जनता पक्षासह हिंदुत्ववादी संघटनांनी टिपूच्या छायाचित्राला विरोध दर्शविला. वाढता विरोध पाहता आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून टिपूचे छायाचित्र हटविण्यात आले. टिपूवरून निर्माण झालेली स्फोटक परिस्थिती निवळत असताना हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपूची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांसोबत करण्याचा करंटेपणा केला. 'शौर्याच्या बाबतीत टिपूला शिवाजी महाराजांच्या बरोबरीने समजले पाहिजे आणि त्याने कोणत्याही विखारी आणि विषारी विचारांना जवळ केले नाही,' असा अफलातून शोध सपकाळांनी लावला. मलबार आणि कुर्ग भागातील हजारो हिंदू नागरिकांना बळजबरीने धर्मांतर करण्यास भाग पाडणारा आणि ज्यांनी नकार दिला त्यांची कत्तल करणारा टिपू सुलतान सपकाळांना कोणत्या मापदंडाने सर्व धर्मीयांचा आदर करणारा शासक वाटत असावा?

साऱ्या समाजाला सोबत घेऊन जाणे आणि सामाजिक सौहार्द जपले जाईल, असे वर्तन आणि व्यवहार करणे हे मोठ्या पदावरील नेत्याकडून अपेक्षित असते. पण, सपकाळ यांना याचे भान राहिले नाही अथवा मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी त्यांनी हेतुपूर्वक हे विधान केले असावे. शककर्ते शिवराय आणि हिंदूंची कत्तल करणारा, धर्मपरिवर्तन करणारा टिपू सुलतान यांची कशी बरोबरी होऊ शकते, याची जाण त्यांना नसावी? टिपूने मलबार आणि कुर्ग भागात हजारो हिंदू नागरिकांचे बळजबरीने धर्मांतर केल्याचे ऐतिहासिक पुरावे आहेत. विशेषतः नायर आणि कोडवा या हिंदू समुदायातील हजारो नागरिकांना अटक करून त्यांना श्रीरंगपट्टण येथे आणले आणि त्यांचे बळजबरीने धर्मांतर केले. टिपूचा बाप हैदरअली हा सुद्धा गद्दार होता. म्हैसूरवर वोडियार घराण्यातील राजे राज्य करीत होते. हैदरने बेईमानी आणि दगाबाजीने म्हैसूरचे राजा कृष्णराज वोडियार आणि पंतप्रधानाला कैद करीत सत्ता हस्तगत केली होती. अशा या बेईमान आणि तुच्छ सरदाराचा टिपू हा पुत्र होता. त्यामुळे, टिनपाट, धर्मांध, क्रूर आणि रक्तपिपासू टिपूची तुलना शिवरायांसोबत करून सपकाळांनी काँग्रेसवाले राजकारण आणि मतांसाठी किती खालच्या पातळीला जाऊ शकतात, हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याचे संतप्त पडसाद राज्यभर उमटत आहेत. शिवप्रेमी संतप्त झाले असून राज्यात ठिकठिकाणी सपकाळांविरोधात आंदोलन सुरू झाले आहे. एवढे होऊनही सपकाळ महाशय यांनी अजूनही माफी मागितली नाही किंवा साधा खेदही व्यक्त केला नाही. उलट, माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनीही शिवरायांचा अवमान केल्याचे उदाहरण देत, मीच कसा बरोबर आहे, हे सांगण्याचा प्रयत्न सपकाळ करीत आहेत. सपकाळांचा हा प्रताप हिंदू समाजाने अजिबात सहन करू नये. काँग्रेस प्रदेशाध्यक्षाच्या या कृतीचा जेवढा निषेध करावा तेवढा कमीच आहे. तो जितका जोरात होईल, तेवढी अशा पिलावळीची हिंमत खचेल, हे समस्त हिंदू समाजाने लक्षात ठेवले पाहिजे.

## दिल्ली दिनांक


रवींद्र दाणी


# रणकंदन - एका पुस्तकावरून!

'फोर स्टार डेस्टिनी' या एका पुस्तकावरून लोकसभेत रणकंदन झाले. प्रकरण लोकसभा सभापतींवर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यापर्यंत गेले. हे सारे अनावश्यक होते. हे पुस्तक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. एका साप्ताहिकाने त्यातील काही अंश प्रसिद्ध केले आहेत. यापूर्वीही ते प्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळे या पुस्तकाबाबत पुन्हा झालेला वाद वा वादंग खरोखरीच अनाकलनीय आहे. पुस्तकातील काही अंश समाज माध्यमांवर सांगितले जात आहेत. दिल्ली पोलिसांनी याबाबत एफआयआर नोंदविला आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या पुस्तकाची डिजिटल आवृत्ती साऱ्या जगात यापूर्वीच प्रसारित झाली आहे. दुसरीकडे पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या 'पेंग्विन इंडिया'ने याबाबत खुलासा करून हे अंश आमच्याजवळ असलेल्या मजकुरातील नसल्याचे म्हटले आहे. प्रत्येक युद्धाचा इतिहास लिहिला जातो. पुस्तकांच्या माध्यमातूनच लिहिला जातो. त्यात चुकीचे असे काहीच नाही. यातून नवनवी माहिती समोर येत असते आणि नवा धडाही शिकला जात असतो.

**पहिल्या युद्धाचा ताळेबंद** : भारत-पाकिस्तान यांच्यात १९४७-४८ मध्ये झालेल्या पहिल्या युद्धाचा इतिहास तर सरकारी दस्तावेजातच लिहिण्यात आला आहे. त्यात भारताला कोणत्या भागात यश मिळाले, कुठे अपयश मिळाले याची माहिती देण्यात आली आहे. पाकिस्तानातील कोटली व मीरपूर यांना जोडणारा झांजड भाग भारताने कसा गमावला याचे सविस्तर वर्णन सरकारी दस्तावेजात करण्यात आले आहे. पाकिस्तानने कसा शर्थीचा लढा देत हा भाग जिंकला याची ती कथा आहे. यात लपविण्यासारखे काहीच नव्हते.

**प्रधान यांचे पुस्तक** : माजी संरक्षण मंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे खाजगी सचिव राम प्रधान यांनी चव्हाण यांनी युद्धकाळात लिहिलेल्या डायरीचा आधार घेत, '१९६५ वॉर द इनसाईड स्टोरी' हे पुस्तक लिहिले. त्यात १९६५ चे युद्ध पंतप्रधानांच्या संमतीशिवाय सुरू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. पंतप्रधानांच्या संमतीविना सुरू झालेले हे बहुधा एकच युद्ध असावे. हा केवढा मोठा खुलासा आहे.

**हरबक्षसिंग यांचे गौप्यस्फोट** : १९६५ च्या युद्धाबाबत लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग यांनी, 'इन द लाईन ऑफ ड्युटी' हे फार सुंदर पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी अनेक गौप्यस्फोट केले आहेत. यात एक रोचक प्रसंग सांगण्यात आला आहे. ते लिहितात, मी एका वरिष्ठ अधिकाऱ्यास भेटावयास गेलो. मी खुर्चीत बसण्यापूर्वी त्यांनी मला विचारले, ''तुम्ही स्वतःला राष्ट्रपती वगैरे समजता काय?'' त्यांचा दुसरा प्रश्न होता, ''तुम्हाला तुमच्या वाहनावर लाल दिवा लावून फिरण्याची हौस आहे काय?'' वरिष्ठ लष्करी अधिकारी आपल्या कनिष्ठाशी कसे वागतात हे सांगण्याचा प्रयत्न हरबक्षसिंग यांनी केला होता. १९६५ च्या युद्धकाळात जनरल चौधरी हे लष्करप्रमुख होते, पण भारत हे युद्ध जिंकला त्यात सिंहाचा वाटा लेफ्ट. हरबक्षसिंग यांचा होता हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते. त्यात अनेक किस्से- कहाण्या सांगण्यात आल्या आहेत. जनरल नरवणे यांच्या पुस्तकात जे सांगण्यात आले आहे, त्यापेक्षा अधिक गंभीर माहिती हरबक्षसिंग यांच्या पुस्तकात १९६५ च्या युद्धाबाबत देण्यात आली आहे.

**हिमालयन ब्लँडर** : १९६२ च्या भारत-चीन युद्धाबाबत ब्रिगेडियर दळवी यांनी लिहिलेले 'हिमालयन ब्लँडर' हे पुस्तक तर बॉम्बपेक्षा कमी नाही, एवढी स्फोटक माहिती त्यात देण्यात आली आहे. १९६२ च्या युद्धासाठी भारतीय लष्कर कसे तयार नव्हते, लष्करी अधिकारी कशा चुका करीत होते याचे सविस्तर वर्णन या गाजलेल्या पुस्तकात करण्यात आले आहे. त्याकाळात, बहुधा हे सर्वाधिक खपाचे पुस्तक ठरले असावे.

**सरेंडर ॲट ढाका** : १९७१ च्या युद्धाबाबत लेफ्ट. जनरल जेकब यांनी 'सरेंडर ॲट ढाका' हे पुस्तक लिहीत त्यात त्यांनी मोठा गौप्यसफोट केला आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना १९७१च्या एप्रिल महिन्यात लष्करी कारवाई हवी होती. पण, तत्कालीन लष्करप्रमुख जनरल माणेकशॉ यास कसे तयार नव्हते याचा तपशील पुस्तकात देण्यात आला आहे. तत्कालीन संरक्षण मंत्री जगजीवनराम यांनी माणेकशॉ यांना राजी करण्याचा प्रयत्न केला. पण, माणेकशॉ तयार झाले नाहीत. अखेर इंदिरा गांधींनी माघार घेत, जनरल माणेकशॉ यांना त्यांचे वेळापत्रक ठरविण्याचा अधिकार दिला आणि डिसेंबर महिन्यात युद्ध झाले. हा सारा तपशील या पुस्तकात देण्यात आला आहे. केंद्रात वाजपेयी सरकार आल्यानंतर जनरल जेकब यांना राज्यपाल नियुक्त करण्यात आले होते.

**कारगिल युद्ध** : १९९९ च्या कारगिल युद्धाबाबत तत्कालीन लष्करप्रमुख जनरल वेद मलिक यांनीही आपल्या आठवणी एका पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत. 'कारगिल : फ्रॉम सरप्राईज टू व्हिक्टरी' या पुस्तकात जनरल मलिक यांनीही धक्कादायक खुलासे केले आहेत. कारगिल कारवाई सुरू झाली २६ मे रोजी. पण, तीन महिने अगोदर २१ व २२ फेब्रुवारी रोजी तत्कालीन संरक्षण मंत्री जार्ज फर्नांडिस व गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी हे आपल्याला कसे वारंवार दूरध्वनी करून माहिती घेत होते हे त्यांनी नमूद केले आहे. युद्धाच्या दुसऱ्या दिवशी २७ मे रोजी भारताने दोन मिग विमाने गमावली तर नंतरच्या दिवशी एक हेलिकॉप्टर गमावले. हा भारतासाठी मोठा धक्का होता हेही जनरल मलिक यांच्या पुस्तकात लिहिण्यात आले आहे.

**गल्वानचा संघर्ष** : जनरल नरवणे यांनी आपल्या पुस्तकात गल्वान संघर्षाबद्दल लिहिले असल्याचे म्हटले जाते. हे संपूर्ण पुस्तक काही गल्वान संघर्षावर नाही. जनरल नरवणे यांनी आपल्या एकूणच लष्करी जीवनावर ते लिहिले आहे. अशा पुस्तकांना संरक्षण मंत्रालयाची हिरवी झेंडी आवश्यक असते आणि ते बरोबरही आहे. जनरल नरवणे यांनी आपल्या पुस्तकाचा मसुदा मंजुरीसाठी अगोदरच सादर केलेला आहे. त्यास मंजुरी मिळाल्यावर हे पुस्तक रीतसर प्रसिद्ध होईल. पण, त्यापूर्वीच त्यावर वादंग होत, त्याला प्रसिद्धी मिळत आहे. काही पुस्तके प्रसिद्ध झाल्यावर 'प्रसिद्ध' होतात. जनरल नरवणे यांच्या पुस्तकाला प्रसिद्धीपूर्वीच प्रसिद्धी मिळत आहे.

**केवळ प्रसिद्धितंत्र?** : जनरल नरवणे यांच्या पुस्तकात तसा काहीही 'दम' नाही. पण, पुस्तक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही याचाच फायदा उठविला जात आहे असे दिसते. संरक्षण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनास एकदाची परवानगी देऊन टाकावी म्हणजे जनरल नरवणे यांनी काय लिहिले आहे ते सर्वांसमोर येईल.


**मात्र इतिहास...** : संरक्षण मंत्रालयातील 'बाबू' हे होऊ देतील काय? जनरल हरबक्षसिंग यांनी सेवानिवृत्त झाल्यावर १९६५ च्या युद्धाबाबत 'वॉर डिस्पॅसेच' या शीर्षकाचे दोन खंड लिहून काढले. ते त्यांनी स्वतः संरक्षणमंत्री जगजीवनराम यांना दिले. लष्करातील नवोदित अधिकाऱ्यांना याचा फायदा व्हावा या उदात्त हेतूने त्यांनी हे केले होते. २५ वर्ष त्यावर काहीच कारवाई झाली नाही. नंतर हरबक्षसिंग यांनी आणखी एक संरक्षणमंत्री कृष्णचंद्र पंत यांची भेट घेत त्यांना याची आठवण करून दिली. पंत यांनी याबाबत लवकर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. संरक्षण मंत्र्यांची भेट घेऊन परतताना हरबक्षसिंग यांनी मंत्रालयातील एका सचिवाची भेट घेऊन त्याला स्पष्ट सांगितले, ''मंत्रालयाने याबाबत १५ दिवसांत निर्णय न केल्यास, मी ते स्वतः प्रसिद्ध करेन.'' अपेक्षेप्रमाणे १५ दिवसांत त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. अखेर हरबक्षसिंग यांनी स्वतः ते खंड प्रसिद्ध केले. जनरल नरवणे यांच्या पुस्तकाच्या बाबतीत याचीच पुनरावृत्ती होईल काय? कारण, संरक्षण मंत्रालयातील बाबू मंडळींनी नवीन नियम करण्याचे ठरविले आहे. त्यास भरपूर वेळ लागणार आहे आणि काळ तर थांबत नसतो.

## वेध


पुंडलिक आंबटकर


# सूर्यग्रहण आणि धार्मिक मान्यता

चंद्र अथवा सूर्याला ग्रहण लागणे या खगोलीय घटना असतात. परंतु, ग्रहणांबाबत काही धार्मिक मान्यतासुद्धा आहेत. जीवसृष्टी पंचतत्त्वांनी बनलेली आहे. त्यामुळे ग्रहणांचा परिणाम जीवसृष्टीवर होतो. २०२६ मध्ये दोन सूर्यग्रहणे आणि दोन चंद्रग्रहणे अनुभवता येणार आहे. यातील तीन ग्रहणे भारतातून दिसणार नसली तरी ३ मार्च रोजीचे खग्रास चंद्रग्रहण आपल्याला पाहता येणार आहे. सूर्यग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहिल्याने दृष्टी गेल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे आवश्यक सुविधा आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय ग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहू नये. १७ फेब्रुवारी रोजी यंदाचे पहिले सूर्यग्रहण लागणार आहे. ही एक खगोलीय घटना असली तरी हिंदू धर्मात अशा घटनेला राहू-केतुमुळे निर्माण होणारी अशुभ घटना मानले जाते. या काळात अन्न आणि पाणी ग्रहण अथवा कुठलेही शुभकार्य वर्ज्य असते. कारण, ग्रहण काळात नकारात्मक ऊर्जेचा संचार होतो, अशी धार्मिक मान्यता आहे. या काळात मंदिरे बंद ठेवली जातात. परंतु, १७ फेब्रुवारीचे सूर्यग्रहण भारतात दिसणार नसल्याने वेधादी नियम पाळण्याची गरज नसल्याचे अभ्यासकांनी स्पष्ट केलेले आहेत. जेव्हा पृथ्वी आणि सूर्याच्या अगदी मधोमध चंद्र येतो तेव्हा सूर्याला ग्रहण लागते. ही घटना अमावास्येला घडते. सूर्य, चंद्र आणि पृथ्वी एका रेषेत आल्याने सूर्य झाकला जातो आणि याच घटनेला सूर्यग्रहण म्हणून ओळखले जाते. जेव्हा पृथ्वीची सावली चंद्रावर पडते तेव्हा चंद्राला ग्रहण लागते.



भारतात अशा घटनांना धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. या काळात मंत्रजप, ध्यान किंवा दानधर्म केला जातो. सूर्यग्रहणाच्या काळात झोप घेणे निषिद्ध मानले जाते. कारण, या काळात वातावरणात हानिकारक किरणे पसरतात. ग्रहणकाळात झोप घेतल्याने पचनसंस्था बिघडण्याची शक्यता असते.

२०२६ मध्ये एकूण चार ग्रहणे लागतील. यात दोन सूर्यग्रहणे तर दोन चंद्रग्रहणांचा समावेश आहे. १७ फेब्रुवारी रोजी लागणारे सूर्यग्रहण रिंग ऑफ फायर अर्थात कंकणाकृती स्वरूपाचे असेल. हे सूर्यग्रहण प्रामुख्याने अंटार्टिका, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भागात दिसेल. हे सूर्यग्रहण दुपारी ३.२६ वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ७.५७ पर्यंत त्याचा प्रभाव राहील. त्यानंतर ३ मार्च रोजी चंद्रग्रहण आहे. हे चंद्रग्रहण खग्रास स्वरूपाचे अर्थातच पूर्ण चंद्राला लागेल. हे चंद्रग्रहण भारतात दिसणार असून सायंकाळी ६.२७ सुरू होईल आणि त्याचा प्रभाव ७.५३ वाजेपर्यंत राहील. हे ग्रहण फाल्गुन पौर्णिमेच्या औचित्यावर येत असल्याने होळी साजरी करण्यासाठी पंचांगाचा आधार घेण्याबाबत जाणकारांकडून सांगितले जात आहे. यानंतर १२ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा सूर्याला ग्रहण लागणार आहे. हे सूर्यग्रहण खग्रास स्वरूपाचे असल्याने संपूर्ण सूर्य झाकला जाईल. हे सूर्यग्रहण भारतात दिसणार नसल्याने वेधादी नियम पाळण्याची गरज नाही. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी यंदाचे दुसरे चंद्रग्रहण लागेल. हे ग्रहण खंडग्रास स्वरूपाचे असून ते अमेरिका, आफ्रिका आणि युरोपात दिसेल. खरे तर ब्रह्मांडात अशा असंख्य घटना रोजच घडतात. परंतु, मनुष्य जगताशी त्यांचा संबंध येत नाही. आपण ज्या आकाशगंगेत राहतो तिला मिल्की वे अर्थातच मंदाकिनी म्हणून ओळखले जाते आणि आपल्या आकाशगंगेचा व्याप १ लाख प्रकाश वर्षे अंतरात आहे. १ लाख प्रकाश वर्षे म्हणजे प्रकाश १ लाख वर्षांत जितका प्रवास करेल, तितके अंतर होय. प्रकाशाचा वेग प्रतिसेकंद ३ लाख किलोमीटर इतका आहे. सूर्य पृथ्वीपासून १४ कोटी ९६ लाख किलोमीटर अंतरावर आहे. व्यासाचा विचार केला तर सूर्य पृथ्वीपेक्षा १०९ पट मोठा आहे आणि त्यात १३ लाख पृथ्वी सामावू शकतात. सूर्यमालेच्या एकूण वस्तुमानापैकी एकट्या सूर्याचे वस्तुमान तब्बल ९९.८६ टक्के इतके आहे आणि तरीही चंद्रासारखा किरकोळ ग्रह आडवा आल्याने सूर्याला ग्रहण लागते! खरे तर सूर्याला ग्रहण लागतच नाही! फक्त चंद्र आडवा आल्याने सूर्य आपल्याला दिसत नाही, एवढीच ही खगोलीय घटना असते. आपल्या सूर्यमालेत बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस, नेपच्युन असे एकूण आठ प्रमुख ग्रह आणि अनेक उपग्रह आहेत. प्लुटोला २००६ पूर्वी नववा ग्रह मानले जात होते. परंतु, त्याला शास्त्रज्ञांनी आता बटू ग्रह म्हणून वर्गीकृत केले आहे. ग्रहण फक्त पृथ्वीवरच अनुभवास येत नाही. तर ज्या मुख्य ग्रहांचे चंद्र ठरावीक कालावधीत सूर्यासमोर येतात तेव्हा त्या ग्रहांवरूनसुद्धा ग्रहणाचा अनुभव येतो. ब्रह्मांड गतिमान असल्याने या घटना घडतात आणि अशा घटनांचे जीवसृष्टीत मोठे योगदान आहे.


९८८१७१६०२७


## यंगिस्तान


जयेश शत्रुघ्न मेस्त्री


# शेवटी मदांध तख्त फोडते मराठी...!

८ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. समाज माध्यम, पत्रकारिता, कलाकार इत्यादी मान्यवरांनी सरसंघचालकांना प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नांवर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी उत्तम मार्गदर्शन केले. १९२५ साली स्थापन झालेली एक संघटना, या संघटनेने १०० वर्षे पूर्ण केलीत. या १०० वर्षांच्या कालावधीत काही वेळा बंदीचे सावट आले, प्रचंड टीका झाली. लोकशाही मूल्यांचे पालन करीत असतानाही लोकशाहीविरोधी, संविधानविरोधी असे आरोप झालेत. अनेक स्वयंसेवकांच्या जिवावर बेतेल असे प्रसंग आले. केरळमधील परिस्थिती सर्वांच्याच परिचित आहे. देशाच्या आपत्तीमध्ये सर्वांत प्रथम उपस्थिती लावूनही थट्टेचा सामना करावा लागला आणि इतकं सगळं होऊनही या संघटनेने अधिकृतपणे कोणाविरुद्ध कारवाई केली नाही किंवा साधी टीकाही केली नाही. इतक्या प्रचंड प्रतिकूल परिस्थितीतून १०० वर्षे पूर्ण करणे हे अग्निपरीक्षा देण्यापेक्षा काही कमी नव्हते. अशा परिस्थितीत कुणी संघाचे विरोधक जरी असले, तरी या सर्व गोष्टींचा विचार करायला हवा. या सामाजिक संघटनेविषयी तरुणांमध्ये इतके आकर्षण का आहे? याचाही विचार व्हायला हवा. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट, संघाची स्थापना महाराष्ट्राच्या भूमीत झाली. ज्यावेळी भारतभर ग्लानी पसरली होती, परकीय आक्रमकांनी हैदोस माजवला होता, जिहादी अतिरेकी प्रवृत्तींचं प्राबल्य वाढत होतं, त्यावेळी मराठी मातीने आपलं तिसरं नेत्र उघडलं... १५-१६ वर्षांच्या एका कोवळ्या मुलाने हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची शपथ घेतली आणि पुढे त्या महामानवाने स्वराज्य स्थापन करून दाखवलं. परकीय आक्रमकांच्या विरोधात अनेक लोक लढतच होते. कुठे ना कुठे उठाव होतंच होता. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी माणसामध्ये एक विश्वास निर्माण केला. ही भूमी आपली आहे, हिंदूंची आहे. इथे हिंदूंचे राज्य असले पाहिजे. स्वराज्य असले पाहिजे.

पुढे मराठ्यांनी भारतावर भगवा फडकवला. जिथे जिथे मराठ्यांची सत्ता होती, तो भाग आज भारत म्हणून ओळखला जातो. ही मराठी माणसाची ताकद आहे. हिंदुत्वाचं काय होणार असा प्रश्न जेव्हा जेव्हा निर्माण झाला, तेव्हा तेव्हा मराठी माणूस तलवार घेऊन सर्वांत आधी आणि सर्वांत पुढे गेला आहे. पण ज्या मराठी माणसांनी ग्लानीत असलेल्या भारताला जागं केलं, त्याच मराठी माणसाला ग्लानी आली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनंतर असा एकही मोठा मराठी नेता झाला नाही, ज्याने मराठी माणसाला योग्य मार्गदर्शन केले असेल. स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व मराठी माणसाने केलं होतं. मग ही ग्लानी का आली? भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषिक राज्यांनुसार भारताची रचना झाली तेव्हा महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचा कट काँग्रेसने रचला. नेहरू हे मराठीद्वेष्टे होते, असं काही जणांचं मत आहे. पण मराठी माणसाने नेहरूंच्या विरुद्ध उठाव करून मुंबई मिळवलीच. त्यासाठी १०५ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. त्यानंतर मराठी राजकारण्यांनी मुंबई केंद्र ठेवून महाराष्ट्राचं राजकारण केलं. काही राजकारण्यांना मुंबईच्या समस्या या सबंध महाराष्ट्राच्या समस्या वाटू लागल्या. त्यातूनच मुळातच समृद्ध असलेल्या मराठी भाषेबाबत भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. कदाचित या गोष्टी मुद्दाम केल्या गेल्या नसतील, पण न्यूनगंडातून त्या झाल्या असतील. या सर्व गोष्टींची आठवण काढण्याची दोन कारणं आहेत. एक, संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमावर स्वतःला आधी मराठी हृदयसम्राट म्हणून घोषित केलेले नंतर हिंदुजननायकमध्ये बदली झालेले व तिथून काही प्राप्त न झाल्याने आता पुन्हा मराठी हृदयसम्राट झालेले राज ठाकरे यांनी टीका केली आहे. भविष्यात ते कोणत्या प्रकारचे हृदयसम्राट किंवा जननायक होतील, याची आत्ताच शाश्वती देता येत नसली, तरी सध्या आपण त्यांच्या सन्मानार्थ मराठी हृदयसम्राटच मानू. बरं, ते मराठी हृदयसम्राट का आहेत, तर ते जावेद अख्तर व इतर मराठी न येणाऱ्या बॉलिवूड कलाकारांसोबत वावरतात आणि अधूनमधून ते मराठीचे मुद्दे उपस्थित करीत असतात. त्यांचे कार्यकर्ते यूपी-बिहारमधल्या लोकांना मारहाण करतात, त्यांच्यावर टीका करणाऱ्या अस्सल मराठी मुलांनाही मारहाण करतात. कारण तेच मराठीचे तारणहार असल्याने त्यांच्यावर केलेली टीका ही मराठीवर केलेली टीका असे गृहीत धरून त्यांचे कार्यकर्ते झुंडीने जाऊन एका निःशस्त्र व्यक्तीला बेसावध असताना मारतात. हा त्यांच्या दृष्टीने फार मोठा पराक्रम होय! या अशा अनेक सद्गुणांसाठी ते मराठी हृदयसम्राट आहेत. असो. तर या मराठी हृदयसम्राटांनी सरसंघचालकांवर टीका केली. याच कार्यक्रमात सरसंघचालकांनी मातृभाषेबद्दल भाष्य केले. संघ मातृभाषेविषयी आग्रही आहे, असे स्पष्ट केले. इंग्रजीचा द्वेष नाही, जिथे जिथे इंग्रजीची आवश्यकता आहे, तिथे तिचा वापर अस्खलित करायचा. पण संघाची भूमिका भारतीय भाषांविषयी आहे, हे त्यांनी स्पष्ट केल्यानंतर मराठी हृदयसम्राटांनी टीका करण्याचे काहीच कारण नव्हते. कदाचित त्यांनी तेवढीच क्लिप बघितली असावी. असो.

या गोष्टी आठवण्याचं दुसरं कारण म्हणजे, २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन आहे. १९६० ला महाराष्ट्राची नव्याने निर्मिती झाली. या ६६ वर्षांत बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. मराठी शाळा आता दुर्मिळ होऊ लागल्या आहेत. आपल्याला मराठी भाषेविषयी आग्रही राहायचे आहे, म्हणजे नेमके काय करायचे आहे? तर, सर्वांत आधी प्राधान्य मराठीला द्यायचे आहे. मराठी शाळांना प्राधान्य द्यायला हवे. त्यानंतर आपण आवर्जून मराठी बोललं पाहिजे. मुलांना मराठी पुस्तके वाचायला लावली पाहिजेत, ऑडिओ पुस्तके ऐकायला लावली पाहिजेत. सोसायटींमध्ये मराठीविषयक कार्यक्रम आयोजित झाले पाहिजेत. दुसरी गोष्ट, मराठी तरुणांनी आंदोलनांपासून दूर राहिलं पाहिजे आणि स्वतःची प्रगती साध्य केली पाहिजे. नोकरी, उद्योग, स्वयंरोजगार यावर लक्ष केंद्रित केलं पाहिजे. सरकारी नोकरीतही टक्का कसा वाढेल याकडे लक्ष दिलं पाहिजे. त्यामुळे सौम्य वाटणाऱ्या अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याद्वारे मराठी भाषेचे जतन करता येईल आणि मराठी संस्कृतीही जपता येईल.

मराठी माणसाला राजकारणाचं खूप वेड आहे. सर्वांत आधी तो पक्षाचा झेंडा खाली ठेवून छत्रपतींचा भगवा झेंडा हाती घेतला पाहिजे. म्हणजे स्वकर्तृत्वाने जग काबीज करण्याचं ध्येय हाती घेतलं पाहिजे. 'साहेब' इत्यादी लोकांपासून चार हात लांब राहिलं पाहिजे. काही मोजके लोक सोडले तर बहुसंख्य मराठी माणूस हुशारच आहे. म्हणूनच मदांध झालेल्या लोकांना मराठी माणसाने महाराष्ट्रभरात विविध निवडणुकींत त्यांची जागा दाखवून दिली आहे. मदांध तख्त मराठी माणसाने फोडलं आहे. महाराष्ट्रात स्थापन झालेल्या संघटनेने १०० वर्षे पूर्ण केली आहेत. आज हे संघटन केवळ देशभरात नव्हे तर जगभरात पसरले आहे. ही मराठी माणसाची ताकद आहे.


writerjayeshmestry@gmail.com


### नागपूरहून सिंगापूर, बँकॉक विमान सेवा सुरू व्हावी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील रिकार्पेटिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर आता नागपूर ते सिंगापूर, बँकॉक आणि क्वालालम्पूर थेट विमान सेवा सुरू करण्याची मागणी संदर्भात पत्र दिले आहे. प्रमुख आंतरराष्ट्रीय स्थळांसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची विनंती असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी केली होती. तसेच याबद्दल सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याने आगामी काळात नागपुरातून विमान सेवा सुरू होण्याची दाट शक्यता आहे. मध्यवर्ती औद्योगिक केंद्र म्हणून नागपूर एक महत्त्वाचे व्यवसाय आणि वेगाने उदयास येत असलेले शहर झाले आहे. टीसीएस, पर्सिस्टंट सिस्टिम्स, ग्लोबल लॉजिक टेक्नॉलॉजी, टेक महिंद्रा, एक्सेंचर, इन्फोसिस आणि इन्फोसेप्ट्स यासारख्या प्रमुख आयटी कंपन्यांनी नागपुरात युनिट सुरू केल्याने, हवाई कनेक्टिव्हिटी वाढण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

नागपुरात ७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत असल्याने आगामी काळात पेर्नोड रिकार्ड, अवाडा ग्रुप आणि कोरियन ग्रुपसारख्या जागतिक कंपन्यांचे जाळे वाढणार आहे. विमान प्रवासी संख्या वाढत असल्याने देशांतर्गत कनेक्टिव्हिटी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. याच बरोबर इंडोनेशियातील बाली या टुरिस्ट प्लेससाठीही नागपूरहून थेट विमानसेवा सुरू करण्यात यावी. नागपूरवरून बालीला जाण्यासाठी सिंगापूर, बँकॉक किंवा क्वालालम्पूरला जाऊन नंतर बालीला विमानसेवा उपलब्ध आहे. तसेच अमेरिकेला जाण्याकरिता नागपूरहून पहिले दोहाला विमानाने जाऊन नंतर दोह्याहून अमेरिकेला जावे लागत आहे. आता नागपूर येथील धावपट्टीच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे ते कोणतेही निर्बंध राहिलेले नाही. त्यामुळे कनेक्टिव्हिटी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना दिलेल्या पत्रानुसार नागपूरहून सिंगापूर, बँकॉक, क्वालालम्पूर, बाली व अमेरिका येथे थेट विमान सेवा सुरू व्हावी, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### देशभक्ती जागवणारा 'वंदे मातरम्'चा निर्णय स्वागतार्ह

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने 'वंदे मातरम्' या देशभक्तिपर गीताबाबत घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. हा निर्णय देशाचा अभिमान वाढवणारा असून जनतेमध्ये



राष्ट्रप्रेम आणि देशभक्ती अधिक दृढ करणारा ठरेल. स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारकांचा घोष मंत्र म्हणजे 'वंदे मातरम्.' या गीतामुळे अनेकांच्या मनात मातृभूमीप्रेम जागृत झाले आणि त्यांनी देशासाठी बलिदान दिले. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षांनंतर या गीताला योग्य तो मान मिळाला, ही आनंदाची बाब आहे. केंद्र शासनाने शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत 'जन गण मन' पूर्वी 'वंदे मातरम्' म्हणणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये देशाविषयी आदर आणि प्रेम अधिक वाढेल, यात शंका नाही. या राष्ट्रहिताच्या निर्णयाबद्दल भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे मनःपूर्वक अभिनंदन! वंदे मातरम्!

**रमा देशमुख**/नागपूर

### 'गरज, नाईलाज की अपरिहार्यता?' योग्य मूल्यमापन

'गरज, नाईलाज की अपरिहार्यता?' हा 'रोखठोक'मधील लेख महाराष्ट्रातील आजच्या राजकीय परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करतो. भारतातील सर्वांत जुना पक्ष काँग्रेसही अनेकदा फुटला आणि आता खरा काँग्रेस पक्ष म्हणजे काँग्रेस (आय) हाच आहे कारण इतर विभागलेले एक तर अस्तंगत झाले वा विलीन झाले आहेत. त्याच धर्तीवर जनता पक्ष स्थापन झाला. त्याची शकले झाली. जनता पक्षातून बाहेर पडल्यावर भाजपा स्थापन करून आता सलग गेली १२ वर्षे केंद्रात व अनेक राज्यांत सत्तेत आहे, पण या भाजपने सुद्धा लोकसभेत २ ही संख्या पाहिली आहे आणि स्वतःच्या कार्यपद्धतीत बदल करत आजचा भाजप दिसतो आहे. आवश्यक तिथे प्रादेशिक पक्षांशी युती, त्यांना सत्तेत प्रामाणिकपणे वाटा देऊन यश बघितले आहे. पण काँग्रेस काय वा आता प्रादेशिक झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काय घराणेशाही जोपासण्याच्या प्रयत्नात मागे पडले आहेत. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणात तर निव्वळ अपरिहार्यता भरून राहिलेली आहे. काँग्रेस पक्षाला योग्य नेताच नसल्याने पक्षाची फरपट चालली आहे. महाराष्ट्र त्याला अपवाद नाही. जोपर्यंत अपरिहार्य होत नाही तोपर्यंत ना मित्र टिकत ना राजकीय पक्ष, विलीनीकरण ही फक्त मलमपट्टी असते.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## चिंतेश्वर पाणपोई चे उद्घाटन शिवराज भैय्या पवार यांच्या हस्ते संपन्न



गेवराई प्रतिनिधी : गेवराई शहरातील कोल्हेरवेस तहसील रोड रोड दाभाडे गल्ली येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुका अध्यक्ष नागेश पंडित यांनी सामाजिक भान लक्षात घेऊन पाणपोई सुरू केली आहे तिचे उद्धाटन युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद गेवराईचे उपनगराध्यक्ष भगवान जिजा घुबर्डे, आदर्श शिक्षक माजी मुख्याध्यापक राजेंद्र घुंबर्डे सर प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे नाभिक समाजाचे नेते नानासाहेब पंडित, बाप्पा जाधव, मोहन अप्पा बेंद्रे, बाबासाहेब सावंत, सागर ठाकूर, गोरख मोटे , ऋषिकेश मोटे विजय पंडित हरि पंडित फुले शिवांश पंडित रवी दाभाडे, बाबा वाघमारे, गणेश भुते, नारायण जगताप, नारायण मुलुक, माजी नगरसेवक शाम काका येवले,राजेंद्र मोटे ,रमेश मोटे प्रेम मोटे राहुल भैया मोटे भाऊसाहेब नाना दाभाडे, अशोकरावजी मडकर, शिवाजीराव लिंगशे,अक्षय आंभाईक कर, रवी मडके, नंदू शिदे आदी मंडळी उपस्थित होते

## संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती



परळी / प्रतिनिधी

परळी येथील लोहमार्ग पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सह्यायक पोलीस उपनिरीक्षक संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाली असून या पदोन्नती निमित्ताने त्यांचा लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथे सत्कार करून खांद्यावर स्टार वाढविण्यात आला आहे.

अनेक वर्षांपासून लोहमार्ग पोलिसांत कार्यरत असलेली संजय काळे हे कर्तव्यदक्ष, निष्कलंक व्यक्तिमत्त्व असून नुकताच पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग पोलीस संभाजी नगर यांनी परळी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय काळे यांच्यासह संभाजी नगर विभाग अंतर्गत इतर 7 पोलीस अधिकारी यांचे पदोन्नतीचे आदेश पारित केले. या आदेशानव्ये संजय काळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती होत लोहमार्ग पोलीस ठाणे परळी येथेच नियुक्ती देण्यात आलेली आहे. संजय काळे यांच्या या पदोन्नती निमित्ताने रविवार दि 15 रोजी पोलीस ठाण्यात सत्कार करत गणवेशवर स्टार लावण्यात आला. या प्रसंगी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघमोडे यांच्यासह इतर कर्मचारी, काळे कुटूंबिय उपस्थित होते. संजय काळे यांच्या पदोन्नती निमित्त मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला आहे.

## प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न; गीतावर विद्यार्थ्यांनी धरला ठेका



केज / प्रतिनिधी : केज तालुक्यातील उमरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. या बाबतीत सविस्तर वृत्त असे की उमरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दि.१४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सायंकाळी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या वेळी बालवाडीतील चिमुकल्यांनी,मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी देशभक्ती,भावगीते, लावण्या अशा विविध गीतावर ठेका धरत प्रेक्षकांचे मने जिंकली. या कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून सुनील केंद्रे (गट शिक्षण अधिकारी केज),हे होते तर अध्यक्ष म्हणून राजाभाऊ इंगळे जी.प.उ.प्राथमिक शाळा उमरी (मुख्याध्यापक), हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय चाटे(जे.शी.वी.अ.केज),सरपंच सौ.सुमनबाई मुळे,बाळासाहेब सावंत(उपसरपंच) संजय चौरे,अर्जुन बोराडे,सुरेश काळे,देशमुख मॅडम,जगदाळे मॅडम, सौन्नर सर, मदने सर,मुळे सर,अरुण पवार,सौ.भडके मॅडम,भय्यासाहेब मुळे,नाना मुळे, फोटोग्राफर रामदास मुळे, फोटोग्राफर भैरट,सुशेन मुळे,तुषार यादव,अश्रुबा खरात आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाबासाहेब केदार व नाईकनवरे सर,यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक राजाभाऊ इंगळे यांनी केले.

## सुभाष सपकाळ यांची राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती : राजेंद्र मस्के

बीड प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.आ. शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार नगर परिषद माजी सभापती श्री. सुभाषराव सपकाळ यांची बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार सय्यद सलीम यांनी सपकाळ यांना नियुक्तीपत्र प्रदान करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुभाषराव सपकाळ यांचे हार्दिक अभिनंदन केले. बीड शहरातील ज्येष्ठ, अनुभवी नगरसेवक तसेच माजी सभापती असलेले सुभाष सपकाळ हे मागील तीन दशकांपासून बीडच्या राजकारणात सक्रीय आहेत.

### परळीतील महापशुधन एक्सपो विक्रमी प्रतिसादाने यशस्वी ; उत्कृष्ट पशुपालकांना ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते पुरस्कार

# पशुपालकांची मेहनत, अनुभव व ज्ञानाचा उपयोग करून पशुसंवर्धन विभाग प्रभावीपणे काम करणार -ना.पंकजाताई मुंडे

### विविध गटातील ८२ पशूपालकांना एक कोटी ७० लाखाची बक्षिसे ; एक्सपोसाठी मेहनत घेणाऱ्यांना केले सन्मानित

**एक्सपोच्या माध्यमातून पशुपालकांच्या उन्नतीसाठी काम करता आले याचा आनंद जास्त**

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ : माझ्या पशुसंवर्धन विभागाने देश पातळीवरील महा पशुधन एक्सपो अतिशय सुयोग्य पद्धतीने नियोजित करून तो यशस्वी केला आहे. या महा पशुधन एक्सपोमध्ये राज्य व राज्याबाहेरील पशुपालकांनी सहभागी होत आपले नवनवीन प्रयोग, पशुंची वाढ व विकास, आपले अनुभव आणि ज्ञान या ठिकाणी प्रदर्शित केले. यातून अनेकांनी माहिती घेत आत्मविश्वासाने पशुसंवर्धनाच्या क्षेत्रात उतरण्याचा निश्चय केला आहे. पशुपालकांच्या या मेहनत, अनुभव आणि ज्ञानाचा उपयोग विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम व उद्योगांमध्ये करून प्रभावीपणे काम करणार असल्याची ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली. एक्सपोच्या माध्यमातून पशूपालकांच्या उन्नतीसाठी काम करता आले याचा सर्वाधिक आनंद होत असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.



13 ते 15 फेब्रुवारी यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या देशपातळीवरील महापशुधन एक्सपोचा आज थाटात समारोप झाला. याप्रसंगी प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध गटाच्या स्पर्धांमधील ८२ पशुपालक विजेत्यांना ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते तब्बल एक कोटी ७० लाख रुपयांची पारितोषिके वितरित करण्यात आली. स्मृतीचिन्ह, पदक व रोख रक्कम असे पारितोषिकाचे स्वरूप होते. पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त प्रवीण कुमार देवरे, डॉ मुकणे, पाटील आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी परळीतील महा पशुधन एक्सपो अतिशय चांगल्या पद्धतीने आयोजित करून उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल पशुसंवर्धन विभागाचे सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. राज्य आणि राज्याबाहेरील पशुपालकांनी तसेच नागरिकांनी सहकुटुंब येऊन या महा एक्स्पोला यशस्वी करण्यासाठी विक्रमी प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

सर्व सामान्यांसाठी असेच काम करत राहू

माझा कार्यक्रम असला की लोक काय आहे हे विचारत नाहीत. नेहमीच अशा प्रकारचं प्रेम जनता आपल्यावर करते. पंकजाताई काहीतरी करत आहेत एवढं कळालं तरी लोक माझे कौतुक करण्यासाठी येतात. मी बोलावलं म्हणल्यानंतर त्याचे काय ध्येय आहे याचा विचार न करता लोक येत असतात ही खूप मोठी कमाई आहे. विविध जिल्ह्यातील लोक आजही या ठिकाणी उपस्थित झाले आहेत. या सर्वांच्या कल्याणाचा आणि सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासाचा हाती घेतलेला हा वसा असाच पुढे चालू ठेवण्याचा आपला प्रयत्न राहील अशी ग्वाही ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली.

नैसर्गिक शेती आणि पशुपालनाकडे कल वाढवा

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, आपल्याकडे नैसर्गिक शेती पूर्वापार चालत आलेली आहे. यातच सुदृढ, समृद्ध आणि निरामय आरोग्याचे गुपित दडलेले आहे. नैसर्गिक शेती आणि पशुपालनातून ही बाब आणखी वाढली पाहिजे या दृष्टीने पशुसंवर्धन विभाग वेगवेगळ्या योजना व उपक्रम राबवत आहे. पशुसंवर्धनातून रोजगार निर्मिती, दुग्ध व्यवसाय आणि आता मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता योजना आपण राबवणार आहोत. परळीतील महापशुधन एक्सपोतून अनेकांना प्रेरणा मिळाली आहे. मी पण आता शेतीकडे लक्ष देणार आहे. प्रत्येकाने पशुपालन आणि नैसर्गिक शेती यात उतरले पाहिजे असे आवाहन ना पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

पशुपालकांच्या ज्ञानाचा उपयोग योजना राबविण्यासाठी करणार

पशुसंवर्धन मंत्री झाल्यानंतर सुरुवातीला आपल्याला वाटले होते की पशुसंवर्धन मध्ये मी काय काम करणार परंतु काम सुरू केल्यानंतर या क्षेत्रात काम करण्याला खूप वाव असल्याचे दिसून आले. पशुसंवर्धन विभाग हा सर्व डॉक्टर, पीएचडी झालेल्या उच्चशिक्षित लोकांचा विभाग आहे. या ठिकाणी काम करताना ज्ञानापेक्षा विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढविणे, समन्वय आणि अंमलबजावणीची आवश्यकता होती. ते करण्याचे काम आपण केले. आमचे अधिकारी , कर्मचारी चांगल्या पद्धतीने नम्रतेने सर्वांना सेवा देतात. त्यामुळेच पशुसंवर्धन विभागाने देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो सारखा उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने यशस्वी करून दाखवला आहे. पशुसंवर्धनातून राज्याच्या आर्थिक गतीला चालना देण्याचे काम होणार आहे. त्या दृष्टीने आपण विभागाच्या पाठीशी खंबीरपणे आहोत. येणाऱ्या काळात सरकारचे उपक्रम, योजना यासाठी पशुपालकांच्या अनुभव, मेहनत व ज्ञानाचा निश्चित उपयोग करून अधिकाधिक प्रभावीपणे काम करणार असल्याचे ना पंकजाताई यांनी सांगितले.

म्हणून मी पण डॉक्टर झाले....

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी काही महत्त्वपूर्ण संदर्भांचा उल्लेख केला. पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम सुरू केल्यानंतर माझ्या लक्षात आले की, या विभागात काम करणारे सर्वच लोक हे उच्चशिक्षित आहेत .कोणी डॉक्टर आहे, कोणी पीएचडी धारक आहे, कोणी वेगवेगळे प्रयोग करणारे संशोधक आहेत, माणसापेक्षा अबोल असणाऱ्या पशुपक्ष्यांशी ज्यांचे घट्ट नाते बनलेले आहे. मुक्या प्राण्यांच्या भावभावना ज्यांना समजतात व अतिशय नम्रपणाने एखाद्या लेकरासारखा सांभाळ ते पशुंचा करतात. असे संवेदनशील लोक या विभागात काम करतात. नुकतीच मला डॉक्टरेट मिळाली. माझ्या विभागातील सर्व डॉक्टरांना शोभावे यासाठीच मी पण आता डॉक्टर आहे असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

**25 वर्षानंतर हे मैदान पुन्हा सजले**

दरम्यान, यावेळी बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी ज्या मैदानावर महापशुधन एक्सपो विक्रमी प्रतिसादाने यशस्वी झाला त्या मैदाना बद्दलची आपल्या खाजगी जीवनातील आठवणही सांगितली. त्यांनी सांगितले की, तब्बल 25 वर्षानंतर या मैदानाला अतिशय रचनात्मक पद्धतीने सजविण्यात आले. सजावट, सर्व व्यवस्था, भोजनावळी, पंगती, जिथल्या तिथे सर्व व्यवस्था, अतिशय सुरेखपणाने ही व्यवस्था झाली. 25 वर्षांपूर्वी अशाच पद्धतीची व्यवस्था माझ्या विवाहाच्या वेळी मुंडे साहेबांनी केल्याची एक हृदयातली एक भावनिक ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितली.

## किल्ले धारूरमध्ये शिवजयंतीनिमित्त सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल

### आरोग्य शिबिर, कीर्तन आणि भव्य मिरवणुकीचे आयोजन; सार्वजनिक शिवजयंती कसबा विभागाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**

किल्ले धारूर (प्रतिनिधी) : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त धारूर येथील सार्वजनिक शिवजयंती कसबा विभागाच्या वतीने यंदाही विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे जंगी आयोजन करण्यात आले आहे. संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय नामदेव शिनगारे यांनी सुरू केलेली ही परंपरा आजही मोठ्या उत्साहात आणि सातत्याने साजरी केली जात आहे.

विविध कार्यक्रमांची रुपरेषा:

आरोग्य शिबिर: १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत रुग्णसेवा हॉस्पिटलच्या सहकार्याने भव्य सर्वरोग निदान व महिला आरोग्य शिबिर पार पडले. यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत महिलांसाठी स्वतंत्र तपासणीची सोय करण्यात आली होती.



धार्मिक कार्यक्रम: १६ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत ह.भ.प. प्रदीप महाराज नरिंग (पंढरपूर) यांचे कीर्तन पार पडले. तसेच १८ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत ह.भ.प. गणेश महाराज गवारे (जालना) यांचे समाजप्रबोधनपर प्रवचन होणार आहे.

शिवजयंती मुख्य सोहळा (१९ फेब्रुवारी): सकाळी ११ वाजता शिवाजी महाराज चौक येथे ध्वजारोहण करण्यात येईल.

दुपारी १२ वाजता चावडी कसबा विभागात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पालखी मिरवणूक काढली जाईल.

दुपारी २ ते रात्री १० या वेळेत भव्य मिरवणूक निघणार असून यात शिवरायांचे जिवंत देखावे, ढोल-ताशा पथक आणि आकर्षक सजावट मुख्य आकर्षण असेल.

सांस्कृतिक वारसा आणि आवाहन:

शिवजयंती केवळ उत्सवापुरती मर्यादित न ठेवता ती समाजोपयोगी उपक्रमांतून साजरी व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. स्वर्गीय नामदेव शिनगारे यांच्या स्मृतीस उजाळा देत राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमांत परिसरातील नागरिक, शिवप्रेमी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती कसबा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**लालबहादूर शास्त्री विद्यालयात मराठवाडा पातळीवरील**

## आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण व समारोप सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

उदगीर (त भा वृत्तसेवा)

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे आयोजन दिनांक २७,२८ जानेवारी2026 रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण सोहळा दिनांक 17 फेब्रुवारी 2026 रोजी संपन्न होणार आहे.

स्पर्धेचे हे ४६वे वर्षे असून पाऊण लाखाच्या वर पारितोषिकांची रक्कम आहे. मराठवाड्यातील ग्रामीण शहरी भागातील शाळांचा उत्स्फूर्त सहभाग या स्पर्धेसाठी मिळाला . एकूण 45 संघाची नोंदणी झाली होती. स्पर्धेचा विषय 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मानवी उन्नतीस तारक की मारक' हा होता विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर अशी विषय मांडणी केली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण दिनांक 17 फेब्रुवारी 2026 रोजी आहे तरी मराठवाड्यातील सहभाग नोंदवलेल्या सर्व शाळांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे. असे आवाहन स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार , माधव मठवाले ,किरण नेमट, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे, सहप्रमुख निलेश मांडवकर , स्पर्धाप्रमुख अनिता मुळखेडे सहप्रमुख राहुल नेटके यांनी केले आहे.

## कला केंद्रातून परतताना मित्राचा निर्घण खून; साळेगावचे पाच मित्र अटकेत

**तभा वृत्तसेवा**



केज/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील चोराखळी येथील महाकाली कला केंद्रात कार्यक्रम पाहून परतत असताना एका ३७ वर्षीय तरुणाचा त्याच्याच पाच मित्रांनी जुन्या वादातून निघृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. केज तालुक्यातील साळेगाव येथील सतीश भागवत मुंडे असे मृताचे नाव असून, याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत पाचही संशयित मित्रांना बेड्या ठोकल्या आहेत. ही घटना १२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री घडली असून, जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी हा कट रचण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मयत सतीश मुंडे हा १२ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास आपल्या पाच मित्रांसह चोराखळी येथील कला केंद्रात नृत्य पाहण्यासाठी गेला होता. मध्यरात्री एक वाजेपर्यंत सर्वांनी कार्यक्रम पाहिला आणि त्यानंतर ते साळेगावकडे परतण्यास निघाले. फिर्यादीनुसा संशयित आरोपींनी सतीशला आधी मद्यपान करवले आणि त्यानंतर घराकडे परतत असताना जुन्या वादाचा राग मनात धरून त्याला गाठले. चालत्या वाहनात किंवा निर्जन ठिकाणी सतीशला लाथाबुक्क्यांनी पोटावर आणि छातीवर इतकी अमानुष मारहाण करण्यात आली की, गंभीर दुखापतीमुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

## चनई ग्रामपंचायतीत बीड हायवेवर राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याचे अनावरण

**तभा वृत्तसेवा**

अंबाजोगाई : चनई ग्रामपंचायतीच्या वतीने बीड हायवेवर राजमाता जिजाऊ यांच्या भव्य पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात देशभक्ती आणि प्रेरणेची भावना दाटून आली.



या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शिवमती राधाताई रामदास सपकाळ जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बीड उपस्थित होत्या तसेच अनिल शिंदे चनई उपसरपंच ,प्रभाकर सावरे, सरपंच पती प्रवीण कदम, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी दत्ता भाऊ सावरे, गायकवाड मामा, विलास सावरे, विजय सावरे, निखिल कदम, बिरुदेव गोचडे तसेच इतर गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. सर्वांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन व अभिवादन करण्यात आले.

राजमाता जिजाऊंच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात आदर्श घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत चनई व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले.

## शेतकऱ्यांसह जनतेची परत दिशाभूल; कथनीवर भर आणि करणी शून्य- किसान सभा

**तभा वृत्तसेवा**

परळी / प्रतिनिधी : अमेरिकेसोबत झालेल्या करारांतर्गत भारतीय कृषी बाजारपेठ ही अमेरिकेकरिता खुली करण्यात आलेली नसल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राज्याचे प्रमुख पालकत्व असलेले मुख्यमंत्री मा देवेंद्र फडणवीस यांनी करत पुढचं पाठ आणि मागचं सपाट या पद्धतीने मागच्या केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणी बद्दल काहीही ठोस कृती नसताना जेव्हा येईल तेव्हा मराठवाड्याच्या विकासाबद्दल घोषणा करून जायचं असा घणाघात किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ऑड.अजय बुरांडे यांनी केला.

परळी येथे सोमवार दि 16 रोजी आयोजित पत्रकार परिषदेत कॉ.ऑड. अजय बुरांडे यांनी सांगितले की, परळी वैजनाथ येथे आयोजित महा एक्सपो 2026 पशुप्रदर्शनात मा मुख्यमंत्री यांनी भारत अमेरिका या मध्ये नव्याने झालेला व्यापार करार याचे स्वागत करत मुख्यमंत्र्यांनी देशाचे प्रधानमंत्री यांचे आभार मानले आणि भारतासाठी अमेरिकेची मोठी बाजारपेठ खुली झाल्याचे सांगितले. तसेच कृषी क्षेत्रात कोणत्याही अमेरिकन मालाला भारतात खुली सूट दिली नसल्याचे या करारात लिहिले आहे असे सांगतानाच कृषी क्षेत्रा संदर्भात कसल्याही प्रकारचा समझोता झाला नसल्याचे सांगत काही लोक जाणीवपूर्वक अफवा पसरून कृषी मालाचे मूल्य पाडत असल्याचे ठणकावून सांगितले.

मात्र इथेनॉल, भारतात बंदी असलेल्या जीएम सोयाबीन पासून तयार केलेले खाद्यतेल, सोयापेंड, पशुखाद्य, स्पिरिट, सुकामेवा, फळे, भाज्या व पोल्ट्री कृषी मालावर प्रक्रिया करून तयार केलेले अन्नपदार्थ यासाठी तूर्तास अमेरिकन मालास 0 % आयात शुल्कात भारतीय बाजारपेठ खुली करून दिली आणि याच वेळी भारतीय मालावर मात्र 18 % आयात शुल्क आकारले. भारतीय कृषी बाजारावर याचा परिणाम होणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी पदग्रहणाच्या वेळी घेतलेल्या शपथीचे स्मरण करून सत्य स्पष्ट करावे. एका बाजूला पर्यावरण, निसर्ग आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे गुणगान गात दुसऱ्या बाजूला उद्योगपत्यांना खाणीसाठी, बंदरासाठी जंगल, जल, जमीन पर्यायी पर्यावरणाचा सगळ्यात मोठा नाश या दहा वर्षांच्या काळामध्ये झालेला आहे. सोयाबीनचा अफवा उठून भाव पडल्याचे आरोप करताना 5330 हमीभाव



असताना साडेतीन हजार रुपयांमध्ये डिसेंबर महिन्यापर्यंत हमीभावाच्या खाली ज्या शेतकऱ्यांना विकावे लागले त्यांना भावांतर योजनेतून राहत देणार आहात का? कापसाचे भाव हमीभावाच्या खाली घसरलेले आहेत हे भाव घसरवण्यामागे आपल्या धोरणाचा मोठा वाटा नाही का? मिनिमम सपोर्टिंग प्राईस ही बाजारभावाला आधार देण्यासाठी असते सीसीआय अंतर्गत शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कापूस आपण शेतकऱ्यांकडील माल संपायच्या आत बाजारभावापेक्षा कमी किमतीत बाजारात विक्रीस काढल्याने कापसाचे भाव पडले असून शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे आपल्या धोरणामुळे झालेल्या या नुकसानाची भरपाई आपण भावांतर योजनेतून देणार आहात का? उत्पादन खर्च व त्यावर दीडपट अधिक भाव अशा प्रमाणे आधारभूत किंमत जाहीर करून शेतात उत्पादित झालेल्या शेतमालाची संपूर्ण खरेदी कायद्याच्या स्वरूपात हमी शेतकऱ्यांना देणार का? मागच्यावेळी करण्यात आलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचे कामाचे काय झाले? असे प्रश्न किसान सभेने उपस्थित केले असून याबाबत लवकर किसान सभेकडून परळीमध्ये शेतकरी परिसंवाद आयोजित करून अमेरिकेसोबत नव्याने झालेला कराराचा कृषी क्षेत्रावर व सर्व सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात होणार विपरीत परिणाम आणि केंद्र आणि राज्य सरकारची शेती आणि शेतकरी विरोधी भूमिका आम्ही किसान सभा शेतकऱ्यांसमोर मांडणार आहे सातत्याने सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी दिवसेंदिवस अडचणीत येत आहे आणि सरकार व जबाबदार लोकप्रतिनिधी धादांत खोटे बोलून लोकांची दिशाभूल करत आहेत.

सोबतच भारताचा प्रमुख कापूस खरीदार देश अमेरिकेतील कापसाची खरेदी करून झिरो टक्के नुसार अमेरिकेत कापड निर्यात करणार आहे तसेच भारतीय टेक्स्टाईल इंडस्ट्रीला सुद्धा अमेरिकेत कापड विकण्यासाठी 18% टेरिफ माफ करून घ्यायचा असेल तर अमेरिकन कापूस झिरो टक्के देण्याचे अमिष अमेरिकेने दाखवले आहे त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी अक्षरशा उध्वस्त होणार आहे याबद्दल मुख्यमंत्री काहीच का बोलत नाहीत उलट या व्यापार कराराचे स्वागत करतात याची किसान सभा जाहीर निषेध करते या विरोधामध्ये जिल्ह्यात ठीक ठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या या जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या वक्तव्याचा व मराठवाड्यातील कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्येस सरण रचणारा हा शेतकरी विरोधी भारत अमेरिका करार याची प्रतिनिधिक स्वरूपात उद्या दिनांक 17 फेब्रुवारी रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणी होळी करून निषेध करण्यात येईल असे ते म्हणाले. या पत्रकार परिषदेस माकपचे जेष्ठ नेते कॉ.पी.एस.घाडगे, सीआयटीयु संघटनेचे जेष्ठ नेते कॉ.प्रा.बी.जी खाडे, कॉ.पी. एस.घाडगे, कॉ पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.प्रकाश चव्हाण आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेचे आभार प्रदर्शन किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ मुरलीधर नागरगोजे यांनी मानले.

# औंढा नागनाथ येथे नागनाथ देवाची पालखी, ठिकठिकाणी पुष्पवृष्टीने पालखीचे स्वागत

## महाशिवरात्रीनंतर भोलेनाथ मामाच्या भेटीला पालखीतून जाण्याची परंपरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ फेब्रुवारी**

महाशिवरात्रीनिमित्त आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ देवाची पालखी मिरवणूक रविवारी (ता. १५) रात्री ७ वाजता काढण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. रवळेश्वर मामा यांच्या भेटीसाठी सजावट करून पालखी काढण्यात आली. यावेळी भजनी पथक, भजनी मंडळे, बँडपथक यासह भाविक यांच्यासह औंढा नगरीतून मुख्य मार्गाने वाजत-गाजत पालखी रवळेश्वर मामाकडे जाऊन नंतर मंदिरामध्ये पोचली.

सायंकाळी ७ वाजता निघालेल्या पालखीचे देवस्थानचे पदसिद्ध सल्लागार तथा आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, खासदार नागेश पाटील आष्टीकर, पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड, तहसीलदार हरीश गाडे, देवस्थानचे अध्यक्ष वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, रत्नाकर बांगर, श्रीराम बांगर आदींच्या उपस्थितीमध्ये विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी नगरपंचायतचे नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, पोलिस निरीक्षक जि एस राहीरे, देवस्थानचे अध्यक्ष वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, मुख्य पुजारी तुळजादास भोपी, हरिहर भोपी, श्रीपाद भोपी, नागनाथ गुरव, रामेश्वर गुरव, दत्त मठाचे महंत श्याम गीरिजी महाराज, दत्त मठाचे उत्तराधिकारी राजेश गिरी महाराज, सपोनि कैलास भगत, पोलिस उपनिरीक्षक अमोल इंगोले, दत्ता कानगुले, पंजाबराव थिटे, सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनुने यांच्यासह पुरोहित पुजारी भजनी मंडळी, नागनाथ मंदिरातील कर्मचारी स्वयंसेवक यांच्यासह नगरसेवक नगरसेविका व शिवभक्त मोठ्या संख्येने पालखी मिरवणुकीमध्ये सहभागी होते .बम बम बोले...! नागनाथ महाराज की जय ...! या जयघोषाने औंढा नगरी भक्तीमय झाली होती. पालखी मिरवणूक मार्गावर ठिक ठिकाणी पुष्पवृष्टीने पालखीचे स्वागत करण्यात आले.

# बसस्थानकाच्या स्लॅबसाठी मंजूर ऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट?

## निविदा अटींचा भंग, गुणवत्ता अहवाल गुलदस्त्यात

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १६ फेब्रुवारी**



शहरात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन बसस्थानकाच्या बांधकामावर पुन्हा संशयाचे ढग दाटले आहेत. बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबचे काँक्रिटीकरण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, या कामात निविदेत मंजूर असलेल्या सिमेंटऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट वापरण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये सिमेंटसाठी ठरावीक कंपन्यांचेच साहित्य वापरणे बंधनकारक असताना प्रत्यक्ष ठिकाणी यादीबाहेरील सिमेंटचा वापर झाल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नियमबाह्य साहित्य वापरून सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, स्लॅबचे काँक्रिटीकरण पूर्ण होऊनही अद्याप नमुना चाचणी अहवाल, गुणवत्ता तपासणी अहवाल तसेच संबंधित अभियंत्याची लेखी मंजुरी सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे काम योग्य झाले असेल, तर अहवाल व कागदपत्रे समोर का येत नाहीत? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, स्लॅबसारख्या महत्त्वाच्या बांधकामात हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी करणे आवश्यक असते. मात्र यासंबंधी कोणताही अधिकृत अहवाल अद्याप समोर आलेला नाही. या प्रकरणावर संबंधित विभाग व प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही.

बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबच्या काँक्रिटीकरणावेळी वाळूचा साठा कामाच्या ठिकाणी आढळून आला नाही. प्रत्यक्षात त्या ठिकाणी डस्टचाच साठा वापरण्यात आल्याचे छायाचित्रांमधून स्पष्ट दिसून येत आहे. आरसीसीसारख्या महत्त्वाच्या बांधकामासाठी दर्जेदार वाळूचा वापर अपेक्षित असताना डस्टचा वापर झाल्यास काँक्रिटच्या मजबुतीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या स्लॅबची हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी होणे आवश्यक ठरत आहे.

पायाभरणीपासून बस स्थानकाचे बांधकाम हे डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या आहेत व आता काही तासापूर्वी तयार करण्यात आलेले बस स्थानकाचे मुख्य स्लॅब देखील डस्ट मध्ये तयार केल्याचे पहावयास मिळाले आहे परंतु इस्टिमेट मध्ये धुतलेले वाळू असा स्पष्ट उल्लेख असताना प्रत्यक्षात मात्र डस्ट मध्ये स्लॅब तयार केला बांधकाम तज्ञांच्या मते सेंट्रिंग उघडतात डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या तडे जातील असा दावा करत आहेत

कोट्यवधींच्या निधीतून सुरू असलेल्या या महत्त्वाच्या बांधकामात काँक्रिटीकरणानंतरही गुणवत्ता तपासणी अहवाल समोर न आल्याने संशय अधिक गडद झाला आहे. गुणवत्ता तपासणी न झाल्यास भविष्यात संरचनेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# विधीनाट्य महोत्सवात पारंपारीक नृत्य कलेचे सादीकरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ फेब्रुवारी**



सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने शहरातील शिवाजी सभागृह येथे विधी नाट्य महोत्सवाचे तीन दिवस चा आयोजन करण्यात आले असून १४ फ ब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीत विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि १४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता विधी नाट्य महोत्सवाचे उद्घाटन सहाय्यक संचालक संदिप बलखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून युवा किर्तनकार गणेश माखणे, विधीनाट्य महोत्सवाचे समन्वय शुभम विभुते हे होते. विधी नाट्य महोत्सवात संबळ आणि हलगी यांच्यात जुगलबंदी ची उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. संबळ समुहाचे भाऊकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संबळ यक्ष हालगी या समुहाचे रवींद्र साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली जुगलबंदी झाली. त्यानंतर गोंधळाचा व नृत्य हे म दनराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गोंधळ नृत्य सादर करण्यात आले. त्याचप्रमाणे गजनृत्य सादर करण्यात आले.दि १५ फेब्रुवारीला पारंपारीक भोपीआराधी, पारंपारीक भारूड, पारंपारीक डायका कथाकथन या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि १६ फेब्रुवारीला दिमडी व चवडंक जुगलबंदी पारंपारीक वाघ्या-मुरळी, पारंपारीक पोतराज, रेणुका देवी जोगती मेळाचे अनेक कलाकारांनी अत्यंत मनमोहक सादरीकरण केले. या कार्यक्रमाला प्रक्षकांनीही भरभरून प्रतिसाद दिला.



**हिंगोली- महाराष्ट्र शासनाच्यावतीने विधीनाट्य महोत्सवाचे आयोजन येथील शिवाजीराव देशमुख सभाहृात करण्यात आले होते. यावेळी कलाकारांनी सादर केलेली दमडी व चवडंकची जुगलबंदी**

## संक्षिप्त वृत्त

### संत सेवालाल जयंती साजरी



हिंगोली- बंजारा समाजाचे आराध्य दैवत आणि थोर समाजसुधारक क्रांतीसूर्य संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वा-तावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी समाजातील विविध म ान्यवरांनी एकत्र येत महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती: भागोराव राठोड, उत्तम राठोड, उल्हास राठोड, सुशील राठोड.अशोक चव्हाण, राजू राठोड, एन. आर. राठोड, बाळू राठोड यु. टी. जाधव, उत्तम पवार, रमेश राठोड, शेषराव राठोड, विक्रम राठोड, संतोष जाधव, पत्रकार पंडित राठोड, सी. के. पवार आणि प्रा. चिंतामण जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

### सपोउपनि संजय मार्के यांचा सत्कार



हिंगोली- श्री व्यंकटेश नेत्रालय फेको अँड रेटीना केअर सेंटरचे संचालक डॉ किशन लखमावार यांचेहस्ते संजय मार्के यांची सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. यावेळी रेटीना सर्जन प्रतीक लखमावार, सुधाकर मेटकर, मुख्याध्यापक बल्लाळ, जगताप, शेख अमजद आदींची उपस्थिती होती.

### बुलढाणा बँकेतर्फे भाविकांना शाबुदाणा खिचडी

हिंगोली- औंढा येथे महाशिवरात्री निमित्त आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ प्रभूच्या दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना बुलडाणा अर्बन परिवारातर्फे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर व कोमल डॉ सुकेश झंवर, सरव्यवस्थापक कासट यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी शाखेतर्फे साबुदाणा खिचडी व केळी वाटप करण्यात आले. नागनाथ मंदिरात ११ वर्षापासून साबुदाणा खिचडी व केळी वाटप करण्यात येत असते.साबुदाणा खिचडी व केळी वाटप या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांच्या हस्ते झाले. बुलडाणा अर्बन बँक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर यांचा नागनाथ संस्थान च्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष तहसीलदार हरीश गाडे यांच्यासह पोलिस कर्मचारी तसेच संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हॉकी स्पर्धेत मुंबई पोलिसांचा संघ विजेता, उपविजेता इटारसी, तृतीय गोरखपूर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ फेब्रुवारी**



ऑल इंडिया हॉकी स्पर्धेचे अजिंक्यपद मुंबई पोलिसांनी पटकाविले आहे. अत्यंत रंगतदार अंतिम सामन्यात मुंबई पोलिसांनी इटारसी संघाचा ३-१ गोलने पराभव करीत अजिंक्यपद मिळविले आहे. उपविजेतेपद पद इटारसी संघाने प्राप्त केले असून तृतीय क्रमांकाचा मानकरी गोरखपुर संघ राहिला असून चतुर्थ क्रमांकावर छत्रपती संभाजीनगर संघाला समाधान मानावे लागले.

रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी जुन्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर जिल्हा हॉकी असोसिएशन द्वारा आयोजित डेप्युटी कमिशनर स्व.दयानंद श्रीलेले स्वर्ण चषक ऑल इंडिया हॉकी टुर्नामेंटच्या नवव्या दिवशी दिवसभरात उपांत्य फेरीतील साम ने खेळविण्यात आले.

अंतीम फेरीतील सामन्यानंतर बक्षीस वितरण सोहळा थाटात संपन्न झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्रीमती मायादेवी दयानंद श्रीलेले यांची उपस्थित होती. प्रमुख पाहुणे म्हणून हिंगोली जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, माजी आमदार गजानन घुगे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, प्राचार्य डॉ. विलास आघाव, माजी सभापती बाबा नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. विजेत्या मुंबई पोलीस संघाला ५१हजार रूपये व चषक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. गोरखपुर (उत्तरप्रदेश) संघाला स्व. सविता जयस्वाल स्मृतिप्रीत्यर्थ फ ुलचंद जयस्वाल यांच्या कडून उत्कृष्ट संघ ट्रॉफी व बक्षीस देण्यात आले. दुसरे पारितोषिक ३१ हजार व ट्रॉफी इटारसी संघाला तर तिसरे पारितोषिक ११ हजार व ट्रॉफी गोरखपुर संघाला मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. आयन क्लब छ. संभाजीनगरला ५ हजार व ट्रॉफी देण्यात आली. यावेळी खेळाडूंनी जल्लोष केला. हॉकी असोसिएशन च्या वतीने जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना शासनाचा उत्कृष्ट सावाक्रर्मी पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

अंतीम फेरीतील सामने पाहण्यासाठी मैदानाव क्रीडा रसिकांनी मोठी गर्दी केली होती. अंतीम फेरीचा पहिला सामना गोरखपूर विरूध्द छत्रपती संभाजीनगर संघात झाला. यामध्ये गोरखपुर संघाने छत्रपती संभाजीनगरचा पराभव करीत तृतीय बक्षीसाचा सन्मान प्राप्त केला. अंतिम सामना मुंबई पोलिस विरुद्ध गोरखपुर या संघात अत्यंत रंगतदार झाला.

मुंबई पोलिस संघाने ३-१ गोलने विजय प्राप्त केला आहे. अंतिम फेरीतील साम न्याच्या वेळी हॉकी स्पर्धे त नवव्या समारोपीय दिवशी चुरशीच्या व रंगतदार लढती झाल्या. अंतीम सामने व बक्षीस वितरण सोहळा सुरू होण्या अगोदर माजी खेळाडू व दिवंगत झा-लेले पदाधिकारी स्व. सुधीर पाटील गोरेगावकर, स्व. भास्कर गुंडेवार, स्व. सुनिल देशमुख, स्व. वसंत दिपक, स्व. हेमंत दिपक, स्व. चंद्रकांत श्रीलेले, अहेमद पठाण या खेळाडूंना आदरांजली अर्पण करण्यात आली. अंतिम सामन्याचे पंच म्हणुन टेकनिकल परिक्षक राजकुमार झा यांनी काम पाहिले. तर पंच म्हणुन प्रशांत मिश्रा, उमेश यादव, सुजल डोंगरे, सचिन गावंडे यांनी काम पाहिले. हॉकी स्पर्धा यशस्वीतेसाठी असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश श्रीलेले, सचिव प्रकाश वाघमारे, पदाधिकारी आयुब पठाण, गोविंद निलजेवार, शैलेश म ुदीराज, जितेंद्र भट्ट, राजु लोहगावकर, कल्याण देशमुख, केशव दुबे, फुलचंद जयस्वाल, संजय शर्मा, वाजिद पठाण, शेषेराव कऱ्हाळे, आनंद भट्ट, अनिल मुदीराज, संदीप मुदीराज, रमेश मुदीराज, ओमप्रकाश दुबे, जयप्रकाश दुबेजी(म ायकल), संस्कार चौधरी, शेख शम्मी, अनिल मुदीराज, विशाल मुदीराज, एँड. सुभाष वाघमारे, ओमप्रकाश संदुल, सचिन शर्मा, आशुतोष श्रीलेले, अनेष तोटे, तुलशीदास चिलमुल, शुभम निज-लेवार, विक्की मुदीराज, सुदांशु मुदीराज, हर्ष जयस्वाल, साई मुदीराज यांच्यासह सर्व पदाधिकारी परिश्रम घेतले. बक्षीस वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन इंगोले यांनी केले. उपस्थितांचे आभार कल्याण देशमुख यांनी मानले. यावेळी हजारावर क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी पुस्तकाच्या बाहेर जाऊन अभ्यास करावा- सिंधूताई दहीफळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ फेब्रुवारी**

विद्यार्थ्यांनी दररोज नियमित महाविद्यालयात येवून जे विषय निवडले आहेत त्या तासाला उपस्थित राहून प्राध्यापक जे शिकवितात त्याच मन लावून अध्यन करावे एवढेच नाही तर प्राध्यापकांनी विषयापुरते न शिकविता विषयाच्या बाहेर जावून जे काही देता येईल ते द्यावे आणि सर्व विद्यार्थ्यांनीही विषया पुरतेच ज्ञान न घेता विषया बाहेर जावून अभ्यास करावा असे ज्येष्ठ कवयित्री सिंधूताई दहीफळे यांनी केले.

कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात तीन दिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रसिद्ध कवयित्री तथा लेखिका सौ.सिंधूताई दहिफळे यांच्या हस्ते स्नेह संमेलनाचे मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले. शाळा असो की महाविद्यालय इथूनच प्रगतीचा मार्ग निघतो. शाळा महाविद्यालयातील स्नेहसंम ेलन विद्यार्थ्यासाठी एक पर्वणीच असते. तो एक विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा अनमोल ठेवा असतो आणि तो या निमित्ताने प्रत्येकानी वेचून घ्यावा. स्नेह संमेलनातच अनेक विद्यार्थ्याच्या कला गुणांना वाव मिळतो. यातूनच अनेक विद्यार्थी उद्याचे नाटककार, गायक, नट, नेता, अभिनेता, विनोदी कलाकार घडतात. त्यामुळे आपले सुप्त गुण इथेच प्रगट करण्याची सुवर्ण संधी मिळत असते आणि विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने केले पाहिजे. विद्यार्थ्यावर अभ्यासाचा आलेला ताण कमी करण्यासाठी सुध्दा असे कार्यक्रम महत्त्वाचे असतात. असे सौ.दहिफळे यांनी सांगितले.



विद्यार्थ्यांनी दररोज नियमित महाविद्यालयात येवून जे विषय निवडले आहेत त्या तासाला उपस्थित राहून प्राध्यापक जे शिकवितात त्याच मन लावून अध्ययन करावं. तसेच विद्यार्थ्यांनी फक्त शासकीय नोकरीवर अवलंबून न राहता इजराईलसारखी शेती असेल किंवा लघुद्योग असतील किंवा विविध क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्यासाठी सदैव तत्पर रहावे.कारण येणाऱ्या काळात सर्वांनाच शासकीय नोकऱ्या मिळणे कठीण होत चालले आहे. अपयश आले तर खचून जावू नका अन् यश मिळालं तर हुरळून जावू नका. विद्यार्थ्यांनी चौकस राहून आपल्या आजू बाजूला घडणाऱ्या गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे कारण तुम्ही उद्याचे सुजाण नागरिक आहात.देशाचे उज्ज्वल भविष्य आहात.तुम्ही कॉलेज कुमार,कुमारिका आ-हात तुम्हाला अभ्यासाची कोणी सक्ती करणार नाही तरी तुम्हाला स्वतः अभ्यास करून स्वतःच भविष्य स्वतः घडवावे लागणार आहे.महाविद्यालयीन वयात प्राध्यापक आपले मार्गदर्शक असतात. आई वडील चांगले शिका अस सांगतात.कारण त्यांच्या नशिबाला आलेले दुःख तुमच्या नशिबी येवू नये ही त्यांची मनापासून तळमळ असते.म ुलांनो प्रयत्न करत रहा यश नक्कीच मिळेल. तेव्हा आयुष्यात संकटांना न घाबरता सामोरे जा विजय तुमचाच आहे. असे अनेक उदाहरणे दिली. यावेळी दहीफळे यांनी त्यांच्या कविता आणि गजल सादर केल्या. विद्यार्थ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर उपस्थित होते. या महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर उपस्थित होते. माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य भोयर, प्राचार्य इंगोले, प्राध्यापक बलखंडे सांस्कृतिक विभाग प्रमुख सावके आदी सह प्राध्यापक, प्राध्यापिका,बहुसंख्य विद्यार्थी, पालक आणि श्रोते उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अ.भा. बालकुमार संस्थेच्या लातूर अध्यक्षपदी भारत सातपुते

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** अ.भा. बालसाहित्य संस्थेच्या लातूर अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते, उपाध्यक्ष जी.जी. कांबळे, सचिव डॉ. नागेश पाटील, सहसचिव वृषाली पाटील,कोषाध्यक्ष डॉ. नयन भादुले-राजमाने, प्रसिद्धी प्रमुख उदय दाभाडे,तर केंद्रीय कार्यकारणीवर प्रतिनिधी म्हणून शैलजा कारंडे यांची निवड झाली आहे. तर डॉ. सुनीता मोरे,रमेश हनमंते, सुलक्षणा सरवदे, कल्याण राऊत ,सविता धर्माधिकारी, सतीश सुरवसे, वैशाली महालिंगे यांचीही कार्यकारणी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



या कार्यकारिणीचे सल्लागार म्हणून प्रकाश घादगिने, रमेश चिल्ले हे राहतील. पुढील तीन वर्षासाठी ही कार्यकारणी असून यावेळी या साहित्य शाखेच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांसाठी अनेक उपक्रम घेतले जाणारे असल्याची माहिती या नवनियुक्त कार्यकारिणीने दिली. या बाल साहित्य संघाचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून राज्यभर या साहित्य चळवळीच्या शाखा कार्यरत आहेत



## विविध वृत्त...

### भूकंपविषयक आपत्ती व्यवस्थापनाची आज रंगीत तालीम; नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**लातूर :** भूकंपासारख्या आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीत कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, काय करावे व काय करू नये, याबाबतची माहिती एनडीआरएफ पथकामार्फत यावेळी दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शोध व बचाव पथके यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनातील महत्वाच्या बाबींची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

### चिवडे पाटील यांनी पुन्हा वाचवले हरीनाचे प्राण

**लातूर :** लातूर तालुक्यातील गंगापूर येथील भाजप कामगार मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योतीराम चिवडे पाटील हे राजकारणात राहूनही मनाने हळवे असणारे नेतृत्व. प्राणी पक्षी कधीही अडचणीत आले, संकटात सापडले की त्यांच्या मदतीला पहिल्यांदा धावून जाणारे.. वॅलेंटाईन डे दिवशी एक घटना घडली. गंगापूर शिवारात काही मोकाट कुत्र्याने एका कळविटास जखमी केल्याची गंगापूर येथील बिपीन कटारे या शेतकऱ्याने यांनी चिवडे पाटील यांना दिली. चिवडे पाटील यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांचे शेत गाठले आणि जखमी हरीनावर प्रथमोपचार करून वनविभागाचे वनक्षेत्र अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक पवार यांना माहिती दिली. त्यांनी कांबळे यांना जीप्सी घेऊन पाठवली. त्यांनी जखमी हरिणास पुढील उपचारासाठी घेऊन गेले.आणि त्या हरीनाचे प्राण वाचले. यावेळी चिवडे पाटील यांच्यासह शेतकरी बिपीन साळुंके, सगर कटारे, धीरज कटारे, बालाजी साळुंके, सुभाष साळुंके, शिवाजी साळुंके, विरेश केळेयांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणातील आरोपीस अटक करण्याची मागणी

**लातूर :** नवोदय विद्यालय लातूर येथे शिकणारी कु. अनुष्का किरण पाटोळे या विद्यार्थिनीच्या मृत्यूची सखोल चौकशी झाली पाहिजे व आरोपीवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. या मागणीसाठी आज सोमवार रोजी सकाळी ११ वाजता साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे चौक लातूर येथून जिल्हाधिकारी कार्यालय लातूरवर विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चात ओबीसी बहुजन आघाडीच्या व ओबीसी जनमोर्चाचे कार्यकर्ते सहभागी होणार असून अनुष्का किरण पाटोळेच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या आरोपीस त्वरित अटक करण्यात यावी अशी मागणी ओबीसी बहूजन आघाडी तर्फे करण्यात येत असून मोर्चात ओबीसी बहूजन आघाडी सक्रिय सहभाग घेणार आहे. अशी माहिती जिल्ह्याचे समन्वयक लक्ष्मण दावणकर यांनी दिली आहे.

### दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**लातूर :** गांधीनगर भागातून जुनी वापरात असलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बुधवारी रात्री घडली. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुरुवारी गुन्हा दाखल आहे. नागेश लिंबराज घडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवारी फिर्यादीचा मावसभाऊ प्रवीण विलास सूर्यवंशी यांच्या मालकीची दुचाकी गांधीनगर येथून चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी गांधी चौक पोलिसात गुन्हा दाखल आहे.

### एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्यू

**लातूर :** येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या इंटर्नशिप ड्राईव्हमध्ये तब्बल ४५ विद्यार्थ्यांची निवड झाली त्यामध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे २५ विद्यार्थी आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंगच्या २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. लेखी परीक्षा तसेच वैयक्तिक मुलाखत घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच इंटर्नशिपच्या कालावधीत या सर्व विद्यार्थ्यांना कंपनीतर्फ मानधन देण्यात येणार आहे. यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. श्रीकांत नागूरे, प्रा. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच इतर समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. शंकर तोडकरी,प्रा.पंकज कोकणे यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर,कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे,.संचालक श्री राजेश्र्वर बुके, श्री बसवराज येरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ ललिता ताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे, श्री प्रा. गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# वृद्ध कलावंतांचे मानधन ३ वर्षांपासून अडवले

## सीईओ दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत वृद्ध कलावंतांना देण्यात येणारे मानधन सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या तीन वर्षांचे मानधन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात न आल्याने वृद्ध कलावंतांचे हाल होताहेत. तेंव्हा वृद्ध कलावंतांचे मानधन का रोखण्यात आले याची प्रशासनाच्या वतीने योग्य ती चौकशी करून वृद्ध कलावंतांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अन्यथा हे सर्व वृद्ध कलावंत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा, उपजिल्हाधिकारी, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. दरम्यान, वृद्ध कलावंतांच्या वतीने आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाही आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्षा यांच्या आदेशानुसार ७ ते ९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पात्र वृद्ध कलावंतांच्या मुलाखती व सादरीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. मात्र त्यानंतर १४ ते १५ महिने उलटूनही निवड यादी जाहीर न होणे, हे केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून थंड डोक्याने राबवलेली अमानवी उदासीनता असल्याचा आरोप कलावंतांनी केला. हे संपूर्ण कामकाज जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्याकडे असताना, गेल्या दीड वर्षांपासून वृद्ध कलावंतांना खोटी कारणे देऊन त्यांना



मानधनापासून दूर ठेवले जात आहे. त्यात कधी अशासकीय सदस्यांचे एकमत होत नाही, कधी शासनाचे परिपत्रक बदलले, कधी हे जुने प्रकरण माझे नाही, तर कधी आमदारांचे पत्र आले आहे, अशी उत्तरे देत वृद्ध कलावंतांना मानधन दिले जात नाही,असाही आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

या योजनेतील बहुतेक कलावंत हे ७०-८० वर्षांचे, विविध आजारांनी ग्रस्त, उपचारासाठी पैसे नसलेले आहेत. अनेकांचे जीवन हे केवळ या मानधनावर अवलंबून आहे. मात्र जि.प. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे त्यांना उपासमार, मानसिक छळ आणि अपमानास्पद प्रतीक्षा सहन करावी लागत आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांश कलावंत हे मागासवर्गीय, असंघटित, अशिक्षित लोककलावंत, तमाशा कलावंत, वादक, गायक असून, शासनाच्या नावाने त्यांच्यावर अन्याय केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

तीन वर्षांचे प्रलंबित प्रकरण तातडीने निकाली काढले नाही, तर लातूर जिल्ह्यातील सर्व कलावंत, जिल्हा परिषदेचे नूतन सदस्य यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा शाहीर सुभाष साबळे, शाहीर वामन हजारे, शाहीर बळीराम घोगरे, शाहीर सुलचंद माळी, मारोतीराव पाटील, दिनकर येडुळे, दिनेश ढोबळे, नवनाथ महाराज म्हेत्रे, शाहीर उत्तम कांबळे, शाहीर धम्मपाल सावंत, लोककलावंत संजय मुंडे, शाहीर अशोक कांबळे, तमाशा कलावंत प्रल्हाद सुरवसे व भीम गायिका जयश्री कांबळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# दयानंद वाणिज्य मध्ये ‘कला आणि कौशल्य’ कार्यशाळेला प्रतिसाद

## युवती कल्याण मंडळाचा पुढाकार; ७० विद्यार्थिनींचा सहभाग

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयात युवती कल्याण मंडळाच्या वतीने ‘‘कला आणि कौशल्य’’ या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थिनींमधील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मार्गदर्शन करताना कला आणि कौशल्य यांचे वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यातील महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या दोन दिवसीय कार्यशाळेत चॉकलेट बुके, फोटो बुके, रेझिन आर्ट वर्क, उलन पॅच रांगोळी अशा उपक्रमांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. एकूण ७० विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उपक्रमांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, बीबीए-एमबीए विभाग प्रमुख वैशाली सातपुते,




बीसीए-एमसीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी तसेच युवती कल्याण मंडळाच्या प्रभारी डॉ. प्रिया वर्मा मंचावर उपस्थित होते. समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली शरणार्थी यांनी केले, तर प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गीतांजली जोशी, प्रा. दिपाली शेख, प्रा. स्नेहल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. ही कार्यशाळा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी व उपयुक्त ठरली असून, भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्याचा मानस संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

## ‘महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६’ अंतर्गत लातूरमध्ये एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि निर्यात वृद्धीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या ‘महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६’ अंतर्गत लातूर जिल्ह्यात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत उद्योग मित्र हॉल, दै.एकमत भवनच्या पाठीमागे, एम.आय.डी.सी., लातूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यशाळेत एमएसएमई उद्योजक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्रे, बँक प्रतिनिधी, संशोधक तसेच जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य यांना विशेष आमंत्रित करण्यात आले आहे. कार्यशाळेत पुणे येथील ‘अपेडा’चे महासंचालक, एमएसएमईचे सहायक संचालक, मैत्री कक्षाचे अधिकारी, इंडियन पोस्टचे अधिकारी, अधिक्षकीय कृषी अधिकारी, एसबीआयचे निर्यात वित्त पुरवठा व्यवस्थापक आदी तज्ज्ञांकडून निर्यात प्रक्रिया, उद्योग विकास, शासकीय योजना, एक जिल्हा एक उत्पादन (जऊजझ) उपक्रम, निर्यात प्रोत्साहन योजना, वित्तपुरवठा सुविधा इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

राज्यातील एमएसएमई क्षेत्राची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करणे, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच निर्यातवृद्धीला चालना देणे या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. सर्व संबंधित उद्योजक, निर्यातदार व घटकांनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

# शिवजन्मोत्सव समितीच्या बुध्दीबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त रविवारी (दि.१५) घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेस स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १७५ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बुध्दीबळ अन लातूरची जणू वेगळी ओळखच दिली.

आर.एन मोटेगावकर विद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन मोटेगावकर स्कुलच्या संचालिका मिनल मोटेगावर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पुजनाने व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दासुमने अर्पण करुन झाले. अध्यक्षस्थानी आरटीओ प्रमोद सरोदे होते.

शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, अॅड. उदय गवारे, अॅड. शिवकुमार जाधव,



डी.एस. पाटील, प्राचार्य नेताजी जाधव, बुध्दीबळ प्रशिक्षक श्रीराम साने, अविनाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मीनल मोटेगावकर यांनी महापुरुषांच्या जयंत्यांना सामाजिक बांधिलकीची जोड देत समिती घेत असलेले कार्यक्रम व राबवत असलेले उपक्रम दिशादर्शक असल्याचे सांगत खेळाडुंनीखिलाडू वृत्ती बाळगळी पाहीजे असे नमुद केले. श्रीराम साने यांनी विद्यार्थ्यांसाठी शिवजन्मोत्सव समिती राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतूक करीत समितीप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

आरटीओ सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले. परिक्षक म्हणून श्रीराम साने, अमित बियाणी, अण्णासाहेब साठे, श्रीकांत मंत्री, विकी महेंद्रकर, पूजा शेळके यांनी काम पाहिले. प्रास्ताविक अॅड. उदय गवारे यांनी केले सुत्रसंचालन भीम दुनगावे यांनी केले. डी.एस. पाटील यांनी आभार मानले. सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या स्पर्धा रात्री सात वाजेपर्यंत चालल्या. स्पर्धकांत खूप उत्साह होता.त्यांच्यासाठी त्यांच्या पालकांनीही दिवसभर स्पर्धास्थळी बैठक दिली होती.

# न्यायदान प्रक्रियेत सखोल अभ्यासाची गरज: मुख्य जिल्हा न्यायाधीश संजय भारुका

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** न्यायदान ही केवळ एक प्रक्रिया नसून ती एक मोठी जबाबदारी आहे. कायद्याच्या गुंतागुंतीच्या चौकटीत सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिलांनी आणि भावी न्यायाधीशांनी कायद्याचा सखोल अभ्यास करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन मा. संजय भारुका मुख्य जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांनी दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या (नॅशनल मूट कोर्ट कॉम्पिटिशन) समारोप समारंभ प्रसंगी केले. दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडलेल्या या स्पर्धेसाठी परीक्षक न्यायाधीश म्हणून मा. आर वाय. शेख निवृत्त मुख्य जिल्हा न्यायाधीश, लातूर, ड. शैलेश चपळगावकर मुंबई उच्च न्यायालय, आणि एमआयटी लॉ स्कूल पुणे येथील डॉ. भावना कडू यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून संघ सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचे सादरीकरण, त्यांचे भाषेवरील प्रभुत्व, तथ्य, कायद्याची मांडणी, हजरजबाबीपणा तसेच कोर्टामधील शिस्त, युक्तिवाद, न्यायालयीन प्रश्नांना दिली जाणारी उत्तरे, मेमोरियल चे लिखाण इत्यादी गोष्टींचे मूल्यमापन करून विद्यार्थ्यांना एकूण ५५००० रुपयांच्या बक्षिसांचे वितरण करण्यात आले. प्रथम पारितोषिक मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय पुणे संघाला त्यांच्या अपवादात्मक वकिली कौशल्यासाठी कायदेशीर युक्तिवादाची स्पष्टता आणि न्यायालयीन शिस्तीसाठी १५००० रुपयांचे रोख बक्षीस, ट्रॉफी आणि उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच दिवंगत डव्होकेट अजय भारतलाल बाजपेयी यांच्या स्मृति प्रित्यर्थ मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिवक्ता ड. अंजली दुबे यांच्याकडून ११००० रुपयांचे रोख पारितोषिक विजेत्या संघाला देण्यात आले. या स्पर्धेमधील उपविजेता सिम्बॉयसिस लॉ स्कूल पुणे यांना त्यांच्या प्रेरक सबमिशन आणि तथ्ये तसेच कायद्यावर मजबूत प्रभुत्व यासाठी १०००० रुपयांचे रोख बक्षीस, ट्रॉफी आणि उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र देउन गौरविण्यात आले. दुसऱ्या क्रमांकावर दयानंद लॉ कॉलेज सोलापूर येथील




संघाला प्रशंसनीय कामगिरीबद्दल ३००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच विशेष पुरस्कारांमध्ये सर्वोत्तम वादी पुरस्कार श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शहा लॉ स्कूल माटुंगा मुंबई यांना त्यांनी केलेले उत्कृष्ट मसुदा लिखाण तसेच संशोधन आणि अचूक कायदेशीर स्पष्टीकरण यासाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्तम प्रतिवादी पुरस्कार नारायणराव चव्हाण लॉ कॉलेज, नांदेड येथील संघाला अनुकरणीय मेमोरियल तयारीसाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्तम युक्तिवादकर्ता पुरस्कार श्रीमती जैनब बेगम अब्दुल रहीम या विद्यार्थिनीला तिची प्रभावी न्यायालयीन उपस्थिती, सुव्यवस्थित युक्तिवाद आणि न्यायालयीन प्रश्नांना आत्मविश्र्वासाने दिलेल्या उत्तरासाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्तम युक्तिवादकर्ता (रनर-अप) श्रीमती आकांक्षा जमादार, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज पुणे यांना त्यांच्या उत्कृष्ट मौखिक वकिली आणि अभिव्यक्तीच्या स्पष्टतेसाठी ३००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. उत्तेजनार्थ पुरस्कारांमध्ये एम एस पी मंडळाचे श्री शिवाजी लॉ कॉलेज परभणी, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज पुणे, श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शहा लॉ स्कूल माटुंगा मुंबई या संघाला प्रत्येकी ३००० रोख बक्षीस ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेने पुन्हा एकदा दयानंद विधी महाविद्यालय लातूरची व्यावहारिक कायदेशीर शिक्षण, वकिली व्यवसायातील नैतिकता आणि राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याची बांधिलकी अधोरेखित केली आहे.

या सर्व बक्षीसांचे वितरण उपस्थित न्यायाधीशांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थित न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी करिअरसाठी शुभेच्छा दिल्या व अशा प्रकारच्या स्पर्धांमधून घेतलेला सहभाग विद्यार्थ्यांना त्यांची कायद्याप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करतो याची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आदिती बिराजदार व प्रतीक्षा चव्हाण या विद्यार्थिनींनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. पुनम नाथानी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ड.रवींद्र शेट्टी व ड. मुस्तफा पठाण यांनी कठीण परिश्रम घेतले.

# तीन हजार रुपयांची लाच स्विकारणाऱ्या केंद्रप्रमुखास अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ फेब्रूवारी-**

अर्जित रजा मंजूर करण्यासाठी तीन हजार रुपयांची लाच स्विकारणाऱ्या केंद्रप्रमुखास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या पथकाने आज अटक केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, तक्रारदार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भादा ता.लोहा येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असून, त्यांच्या खाजगी कारणास्तव त्यांनी अर्जित रजेसाठी अर्ज केला होता.सदरची रजा मंजूर करण्यासाठी त्यांनी पंचायत समिती कार्यालय येथे अर्ज दिला होता. आरोपी दिगंबर शिंदे जे जिल्हा परिषद शाळा रीसनगाव ता.लोहा जि.नांदेड येथे असून सध्या ते केंद्रप्रमुख पंचायत समिती लोहा कार्यालयामध्ये कार्यरत आहेत. अर्जित रजा मंजूर करण्यासाठी तुम्हाला चार हजार रुपये द्यावे लागतील, असे त्यांनी सांगितल्यानंतर तडजोडीनंतर तीन हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर साध्या वेशात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे अधिकारी लोहा येथे आले. आणि त्यांनी तक्रारदाराकडून दिगंबर शिंदे या केंद्र प्रमुखास तीन हजार रुपयांची लाच घेताना अटक केली. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या पथकाने दिगंबर शिंदे यांची अंगझडती घेतली तेंव्हा त्याच्याकडे एक सॅमसंग मोबाईल व २७०० रुपये मिळून आले. सदरचा ऐवज जप्त करण्यात आला असून आरोपीची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. सापळा अधिकारी अनिता चव्हाण, प्रशांत पवार, अर्चना करपुडे यांनी हि कारवाई यशस्वी केली.

# कंधार येथे शिवजन्मोत्सव निमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १६ फेब्रूवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवानिमित्त कंधार शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यातील विविध कलागुण च्या कार्यक्रमात कलाकारांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन शिवजन्मोत्सव समितीने केले आहे.



कंधार तालुका सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीने दि.१५ फेब्रुवारी रोजी पत्रकारांशी संवाद साधला.यावेळी समितीचे अध्यक्ष विनोद तोरणे,सचिव परमेश्वर जाधव,सहकोषाध्यक्ष भगवान गिरे,संभाजी लाडेकर, त्रिभुवन मोरे, शिवाजी तोंडचिरे,नितीन कोकाटे यांची उपस्थिती होती.

दि.१७ फेब्रुवारी रोजी विविध कलागुणांचा कार्यक्रम होणार आहे.यात १ वी ते ७ वी व ८ वी ते १२ वी असे दोन शालेय गट असून या कलागुणात सहभागी होण्यासाठी मोफत प्रवेश आहे.प्रथम,द्वितीय व तृतीय असे क्रमांकासाठी रोख बक्षिसे मिळणार आहेत.दि.१८ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाशेजारी फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात आहे आहे.

दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी सकाळी १० वाजता शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा दुग्ध अभिषेक महंत अवधूत गिरी गणेश गीर महाराज मठ संस्थान डोंगरगाव बचोटी व श्री संत नामदेव महाराज बारूळकर मठ संस्थान बारूळ या गुरुवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दुपारी २ वाजता छ.संभाझी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेचे भूमिपूजन श्री संत नामदेव महाराज मठ संस्थान उमरज चे मठाधिपती एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या अध्यक्षतेखाली कंधार लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.तर दुपारी ३ वाजता बालाजी मंदीर भवानी नगर कंधार येथून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन होऊन येथून भव्य मिरवणूक निघणार असून ती महाराणा प्रताप चौक-माईचे मंदीर साठे नगर मार्गे शिवाजी महाराज स्मारकाजवळ मिरवणूकीची सांगता करण्यात येणार आहे.

## शेषराव कांबळे नागणीकर पेंटर यांचे निधन


**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ फेब्रूवारी-**

सिडको संभाजी चौक येथील रहिवासी नागणी तालुका बिलोली येथील मूळचे रहिवासी असून शेषरव गंगाराम कांबळे व्यवसाय पेंटर हे गेल्या चार वर्षापासून अर्धांग वायू या आजाराने त्रस्त घरात पडून होते. यातच दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाचच्या दरम्यान मृत्यू झाला मृत्यू समयी त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांच्या पार्थिव देहावर सिडको येतील वैकुंठधाम समशान भूमी येथे दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, असा मोठा परिवार आहे.

# सिडकोत सार्वजनिक शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ फेब्रूवारी-**

सिडको येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सवानिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोहोत्सव विविध स्पर्धांचे व वैचारिक मेजवानीसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक सिडको हडकोच्या मुख्य रस्त्याने निघून जिजाऊ सृष्टी येथे विसर्जित करण्यात करण्यात येईल या ठिकाणी सायंकाळी सहा वाजता शिव कीर्तनकार ज्योतीताई जाधव यांचा प्रबोधनात्मक कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे .



सिडको येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक शिवजन्मोत्सवाचे आयोजन समितीचे अध्यक्ष साहेबराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. यावेळी दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:३० वाजता सामान्य ज्ञान स्पर्धा दोन गटात होणार आहे. यामध्ये ५ ते ८ पहिला गट ८ वी ते १० वी दुसरा गट अशा दोन गटात स्पर्धा होतील. प्रथम विजेत्यास ७०० रुपये, द्वितीय विजेत्यास ५०० रुपये तर तृतीय विजेत्यास ३०० रुपये बक्षीस दिले जाणार आहे. तसेच लेझीम स्पर्धा मध्ये प्रथम विजेत्यास ३१००, द्वितीय विजेत्यास २५०० रुपये तर तृतीय विजेत्या १००० रुपये बक्षीस दिले जाणार आहेत. ही स्पर्धा हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात घेण्यात येईल. दिनांक २० फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता हडको शिवाजी महाराज पुतळ्यापासून लेझीमच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तील चित्राची मिरवणूक निघणार आहे. त्याचवेळी दुपारच्या सत्रात सायंकाळी ६ वाजता जिजाऊ सृष्टी येथे ह भ प शिवकीर्तनकार ज्योतीताई जाधव यांच्या प्रबोधन पर कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार अशोकराव चव्हाण असून उद्घाटन प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते होणार आहे. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार रवींद्र चव्हाण, डॉ. अजित गोपखेडे, राज्यमंत्री तथा गटनेते हेमंत पाटील, दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आ. मोहनराव हंबर्डे, संतुकराव हंबर्डे, विनय गिरडे तसेच नवनिर्वाचित नगरसेवक संजय पाटील घोगरे, श्रीमती मंगलाताई देशमुख,सौ. सुवर्णा बसवते, वैजनाथ देशमुख, सौ निरंजनाताई लांडगे यांची उपस्थिती राहणार आहे. हा शिवजन्मोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी समितीचे अध्यक्ष साहेबराव मोरे, दीपक भरकड, नामदेव चव्हाण, संदीप कदम, एकनाथ पाटील, सौ शकुंतला पांडे, बळवंत निर्मले, प्रमोद टेकाळे हे परिश्रम घेत आहेत.



## कपिल इलेव्हन संघ खासदार चषकचा विजेता,अझहर इलेव्हन संघ उप विजेता

**मुदखेड** - स्वातंत्र्य सेनानी स्मरणार्थ नागेली येथे खासदार चषक क्रिकेट साखळी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील ६० क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. क्रिकेट साखळी सामन्यात अंतिम फेरीत कपिल इलेव्हन संघ तसेच अजहर इलेव्हन संघ यांच्यात रोमांचक सामना झाला. या अतितटीच्या सामन्यात कपिल इलेव्हन संघ खासदार चषक विजेता ठरला आहे. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते विजेत्या संघास ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ३३३३३/- रुपये देऊन सन्मानित करण्यात आले आहे. उपविजेता संघास जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर यांच्या हस्ते ट्रॉफी ,सन्मानचिन्ह, रोक २२२२२/- रुपये देऊन संघाचा गौरव करण्यात आला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ११११११/- रुपये देऊन संघास प्रोत्साहित करण्यात आले आहे. यावेळी यावेळी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक यशपाल भिंगे, काँग्रेस किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे, काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर राजेगोरे, माजी उपसरपंच जनार्दन शिंदे, आयोजक गणपतराव शिंदे, बालाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते स्वतंत्र सैनिकांचे वारस आनंद गिरी, रतन गिरी, कचरू शिंदे, आनंदराव गव्हाणे, मारोतराव पाटील पुयड, विनायक पुयड, काशीराम कुऱ्हाडे, गफूर शेख, विठ्ठल तामसेकर, चंद्रभान गव्हाणे, माधवराव पांचाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. क्रिकेट साखळी सामन्यातील मॅन ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज , उत्कृष्ट झेल या क्रिकेटपटूंना आकर्षक बक्षीसे बहाल करण्यात आली आहेत. उत्कृष्ट पंच राहुल शिपरकर , संदीप गव्हाणे तसेच समालोचक अरविंद जाधव वडगावकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

## चुडावा येथे माता रमाई जयंती साजरी


**चुडावा** -चुडावा येथे दिनांक १६ फेब्रुवारी रोज सोमवारी माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ जयंती सोहळा साजरा करण्यात आला.



सकाळी साडेनऊ वाजता सरपंच कांताबाई देसाई यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. भंदत डॉ.उपगुप्त महाथेरो, भिक्खू पंयावंश पूर्णा ,यांनी धम्मदेशना दिली त्यानंतर कार्यक्रम घेण्यात आला यावेळी जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ता डॉ .भारती मंठवई येवलीकर यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मागील चा दिवस विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले .रात्री आठ वाजता बाल बालिका नवयुवक यांचा महामानवाच्या जीवनावरील गाण्यांचा नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी आशाबाई गच्चे, सुशिलाबाई धुतराज, विपुल शेळके, प्रदीप धुतरात, तेजस सरपाते , संजय गच्चे, बाबुराव शेळके, गंगाधर राऊत,आदीसह मोठ्या संख्येने गावात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी गिरीधर पाटील यांची नियुक्ती

**बिलोली** -तालुक्यातील हिप्परगामाळचे रहिवासी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते गिरीधर पाटील डाकोरे यांची काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी(दक्षीण)नियुक्ती करण्यात आली आहे. सदर निवडीचे नियुक्ती पत्र एका नियोजित कार्यक्रमात दि.१५ रोजी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्रामुख्याने खा.रविंद्र पाटील चव्हाण,काँग्रेसचे माजी युवा प्रदेश सरचिटनिस केदार पाटील साळुंके, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा.शिवाजी पाटील पाचपिंपळीकर, माजी सभापती संजयअप्पा बेळगे, प्रवक्ते बालाजी पाटील गाडे, प्रकाश पाटील बडुरकर, नगरसेवक संदिप कटारे, वलियोद्दिन फारूखी, सौ. चेतना जाधव, माजिदसेठ कासराळीकर, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.काँग्रेस पक्षात उलथापालथ झाल्या नंतरही तळागाळातील शेवटच्या घटका पर्यत संबंध असलेले पाटील यांनी पक्षावरील आपली निष्ठा कायम ठेवून स्थिर आहेत. गिरीधर पाटील यांनी यापूर्वी बिलोली तालुका अध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस सरचिटणीस अशा विविध पदावर उत्कृष्ट काम केले आहेत. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची उपाध्यक्षपदी निवड केल्याने सर्वस्तरातून त्यांचे स्वागत होत आहे.



# डॉ. पूजा गायकवाड यांच्याकडे काँग्रेस महिला आघाडीची धुरा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १६ फेब्रूवारी-**

देगलूर तालुक्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी डॉ. पूजा सचिन गायकवाड यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील महिला संघटनात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. पुजा गायकवाड ह्या प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ असून त्यांनी वैद्यकीय सेवेबरोबरच, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.



या निवडीचे अधिकृत पत्र जिल्ह्याचे खासदार प्रा. रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार तथा काँग्रेस जिल्हाध्यक्ष हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी दिले आहे. यावेळी माजी सनदी अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर, माजी नगराध्यक्ष तथा शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, नवनियुक्त तालुकाध्यक्ष विष्णूकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. पूजा गायकवाड या सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात. महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती, समाजप्रबोधन तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. तळागाळातील महिलांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या मांडण्याचे आणि त्यावर उपाययोजना राबविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या निवडीमुळे देगलूर तालुक्यातील काँग्रेस महिला आघाडीमध्ये नवचैतन्य संचारले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. पक्षाने महिलांना नेतृत्वाच्या मुख्य प्रवाहात स्थान देण्याचा निर्धार व्यक्त करत महिला आघाडीच्या माध्यमातून गावोगावी संघटन अधिक सक्षम होण्याची दाट शक्यता आहे.

आगामी काळात महिला बचतगट सक्षमीकरण, युवक-युवती संवाद, सामाजिक प्रश्नांवरील जनजागृती मोहीम आणि पक्षाच्या धोरणांचा प्रसार यावर विशेष भर दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. डॉ. पूजा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडी संघटनात्मक एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन या तत्त्वांवर कार्य करेल, असा विश्वास पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, देगलूर तालुक्यात काँग्रेस पक्ष अधिक सक्षम आणि संघटित करण्याच्या दिशेने महिला आघाडीची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचा आशावाद व्यक्त होत आहे.

## खुशी सेवाभावी संस्थेची तालुक्याबाहेर झेप

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १६ फेब्रूवारी-**

देगलूर (प्रतिनिधी): देगलूर तालुक्यात सामाजिक कार्याची ठाम छाप उमटवणाऱ्या खुशी सेवाभावी संस्थेने आता आपली सेवा तालुक्याबाहेर विस्तारत मुखेडमध्येही कार्याचा नवा अध्याय सुरू केला आहे. मुखेड तालुक्यातील श्रावण बाळ मंदिरात आयोजित सात दिवसीय रामचरितमानस कथा सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यंदाच्या सप्ताहासाठी खुशी सेवाभावी संस्थेने पुढाकार घेत संपूर्ण आयोजनात मोलाचे योगदान दिले आहे. सकाळपासून सायंकाळपर्यंत मंदिर परिसरात रामनामाचा अखंड गजर, भजन-कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांसह परिसरातील विविध गावांमधून हजारो भाविक दररोज उपस्थित राहत आहेत.




या सप्ताहाचे नियोजन श्रावण बाळ मंदिराच्या सभासदांनी सुयोग्य पद्धतीने पार पाडले असून संस्थेच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाला विशेष यश लाभले आहे. धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्यामुळे खुशी सेवाभावी संस्थेची ओळख अधिक दृढ होत असल्याचे चित्र मुखेडमध्ये पाहायला मिळत आहे. यावेळी मंदिर सभासदांनी संस्थेचे अध्यक्ष एकनाथ उर्फ बबलू टेकाळे व त्यांच्या परिवाराचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान केला. त्यांच्या हस्ते मंदिरात आरती करण्यात आली. उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

स्वागत समारंभानंतर एकनाथ बबलू टेकाळे यांच्या हस्ते भाविकांना मोतीचूर लाडूंचा प्रसाद वितरित करण्यात आला.

# भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांची १९ फेब्रुवारी रोजी धम्मदेसना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ फेब्रूवारी-**

माघ पौर्णिमा निमित्ताने तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात १९ फेब्रुवारी रोजी माघ पौर्णिमेनिमित्त पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक भदंत पंय्याबोधी थेरो यांचे गुरु भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, पूर्णा यांची धम्मदेसना आयोजित करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.



सकाळी अकरा वाजेपासून सुरू होणाऱ्या कार्यक्रमात धम्मध्वजारोहण, परित्राणपाठ, त्रिरत्न वंदना, गाथापठण, भोजनदान, आर्थिक दान, औषधी तथा विविध वस्तूंचे दान, धम्मदेसना, बुद्ध भीम गितांच्या गायनाचे कार्यक्रमासह भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, पूर्णा यांची धम्मदेसना होणार आहे. त्यानंतर रमा माता महिला मंडळ, राजमाता महिला मंडळ, पंचशील नगर, श्रमसाफल्य नगर, यशोधरा महिला मंडळ गंगा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य भोजनदानाचेही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला श्रामणेर भिक्खू संघ यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरही उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्काऊट गाईड विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,सेवाभाव, आत्मनिर्भरत चारित्र्य घडविते : प्रणितताताई देवरे

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १६ फेब्रूवारी-**

स्काउट गाईड मेळाव्यातून विद्यार्थ्यांना शिस्त सेवाभाव, आत्मनिर्भरता आणि चारित्र्य घडविते आजच्या रिल्स - सोशल मिडियाच्या काळात शालेय शिक्षणात स्काउट-गाईड हा विषय ऐच्छिक न राहता तो अनिवार्य करणे काळाची गरज आहे. असे प्रतिपादन भाजपा प्रदेश महिला आघाडीच्या उपाध्यक्षा जलचळवळी प्रणेत्या प्रणिताताई देवर-चिखलीकर यांनी केले

जिल्हास्तरीय स्काउट गाईड मेळाव्याचा समारोप प्रसंगी उपनगराध्यक्ष करीम शेख उपशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे गटनेते भास्कर पवार , स्काउट गाईड जिल्हा संघटक जनार्धन इरले,चेअरमन स्वप्नील पाटील उमरेकर आयोजक सुदर्शन शिंदे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती आंबटवाड, शिक्षणविस्तार अधिकारी डी आर शिंदे , विठ्ठल आचणे माजी संपरच राम पाटील मुरंबेकर, सुधाकर पवार, तुकाराम दाढेल अविनाश पवार, पंचशील कांबळे बी-डी. जाधव, विठ्ठल चव्हाण मुख्याध्यापक दामोधर वडजे, फाजगे, सुर्यवंशी, भागिरथी बच्चेवार, रमेश फुलारी, प्रलोभ कुळकर्णी मेळावा प्रमुख बालाजी तोरणेकर ,सतीश वाकोरे, रवी ढगे, केंद्रीय मुख्याध्यापक कविता मुदखेडे, वर्षाताई जाधव, मंजुळाताई जाधव यासह मान्यवर उपस्थित होते.

माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी अत्यंत पोटतिडकीने आजच्या विद्यार्थ्यांना शिस्त, अभ्यास तसेच जीवन मूल्याविषयी मार्गदर्शन केले. प्रास्तानिक , बालाजी तोरणेकर व सतीश वाकोरे योनी केल.संचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी तर आभार गाईड संघटक माधुरी जवणे यांनी आभार मानले मानले.

**विजेता शाळांना बक्षिस प्रदान**

स्काऊड गाईड मेळाव्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्या , शोभा यात्रा ते क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या त्याचे बक्षीस माजी आ रोहिदास चव्हाण, उनगराध्यक्ष करीम शेख, उपशिक्षणाधिकारी राठोड व बिईओ व्यवहारे जिल्हा संघटक इरले व उपस्थितांच्या हस्ते दिवंगत अजित पवार यांच्या नावाचे स्मृतिचिन्ह आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते देण्यात आले.देण्यात आले.संचलन विनोद सोनटक्के यांनी संचनल केले अकोले याचा सत्कार करण्यात आला.

# नारीशक्तीचा गौरव: 'पिंक सेंटर' उपक्रमातून परीक्षेचा नवा आदर्श

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १६ फेब्रूवारी-**

येथील हुतात्मा जयवंतराव पाटील कन्या शाळा व उच्च माध्यमिक विद्यालय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी यावर्षी एक अभिनव आणि कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर केंद्रप्रमुख आर .एस . कागणे यांच्या अभूतपूर्व अभिनव संकल्पनेतून पर्यवेक्षण करणाऱ्या पासून ते सुरक्षा रक्षका पर्यंत महिलांची नियुक्ती करून 'पिंक सेंटर' ही संकल्पना राबवण्यात आली आहे.

**स्त्री शक्तीचा सन्मान आणि सुरक्षित वातावरण**

परीक्षेचा काळ हा विद्यार्थ्यांसाठी तणावाचा असतो. अशा वेळी परीक्षा केंद्रावर महिला कर्मचाऱ्यांची उपस्थिती विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करते. आदरणिय केंद्रप्रमुख कागणे यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने या केंद्राचे कामकाज हाताळले असून, सर्व महिला कर्मचाऱ्यांनी शिस्त आणि आपुलकीचा सुरेख संगम घडवून आणला आहे.



आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. शिक्षण विभागाने आणि केंद्रप्रमुखांनी परीक्षा केंद्राची संपूर्ण धुरा महिलांच्या हाती देऊन समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. 'पिंक सेंटर' मुळे परीक्षेचे वातावरण अधिक प्रसन्न आणि शिस्तबद्ध झाले आहे.

**तालुका दक्षता कमिटी चे सहकार्य**

तालुक्यांच्या तहसिलदार पल्लवी टेमकर मॅडम स्वतः एक महिला असल्यामुळे त्यांनी हा अभिनव उपक्रम आवर्जून राबण्यासाठी पुढाकार घेऊन केंद्रप्रमुखांना बळ दिले . तसेच गटशिक्षणाधिकारी मेकाले सर व शिक्षण विस्तार अधिकारी अरुण पाटील यांनी केंद्रप्रमुखांना प्रोत्साहन दिल्यामूळे उपक्रमाची स्वप्न पूर्ती होऊ शकली .

**संस्थेच्या अध्यक्षा सुद्धा महिलाच**

संस्थेच्या अध्यक्षा माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री सुर्यकांताताई पाटील यांच्या या संकल्पनेची बाब निदर्शनास आल्यावर त्यांनी अत्यावश्यक ती सर्व यंत्रणा उभी करून देऊन या अभिनव उपक्रमांचे कौतुक केले.

**बैठे पथक प्रमुख**

तालुक्यातील एक शिस्तप्रिय महिला कर्मचारी गोणेवार मॅडम यांची नियुक्ती परिरक्षक कार्यालया मार्फत करण्यात आली होती .

**नियोजन**

परीक्षा केंद्रावरील महिला पर्यवेक्षक देण्याचं नियोजन मुख्याध्यापक यांनी केले, तर महिला सुरक्षा रक्षक पुरवण्याचे नियोजन पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी केले. केंद्राची सजावट आणि व्यवस्थापन 'पिंक' थीमवर आधारित, ज्यामुळे केंद्राला एक वेगळी ओळख मिळाली. विद्यार्थिनींना कोणताही संकोच न वाटता परीक्षेला सामोरे जाता आले. हा उपक्रम केवळ एक प्रयोग नसून स्त्री शक्तीवर टाकलेला विश्वास आहे. या यशस्वी अंमलबजावणीमुळे आगामी काळात अशा 'पिंक सेंटर'ची संख्या वाढण्यास निश्चितच मदत होईल.